# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. MAHMAR 2023/84526

प्रजासत्ताक दिन निमित्त सर्व भारतीयांना हार्दिक शुभेच्छा.!

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -११ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.२६ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## ‘शंख, नादस्वरम...’, पहिल्यांदाच १०० महिलांनी भारतीय वाद्ये वाजवून केली परेडची सुरूवात

**दि. २६ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

देशभरात ७५ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. त्यानिमित्त राजधानी नवी दिल्लीसह देशभरात अनेक ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. दिल्लीत कर्तव्य पथावर परेड काढली जात आहे. या परेडच्या माध्यमातून संपूर्ण जगाला भारताची ताकद आणि सांस्कृतिक झलक दिसत आहे. मात्र, यंदाची परेडची सर्वात खास आहे. कारण, यंदा १६ जानेवारीची परेड भारतीय वाद्य वाजवून सुरू झाली.



याशिवाय, दुसरी विशेष बाब म्हणजे यावेळी महिला कलाकारांच्या पथकाने परेडला सुरुवात केली. यंदा परेडची सुरुवात शंख, नादस्वरम आणि नगारा या भारतीय वाद्यांच्या आवाजाने झाली. १०० महिला कलाकारांच्या तुकडीने २६ जानेवारीला पहिल्यांदाच परेड सुरू केली. या महिला कलाकारांनी शंख, नादस्वरम, नगाडा, ढोल-ताशा इत्यादी पारंपारिक वाद्ये वाजवून या परेडची सुरूवात केली. या वादक पथकामध्ये विविध राज्यांतील महिलांचा समावेश दिसून आला. एएनआयने या संदर्भात ट्विट केले असून याचा व्हिडिओ देखील शेअर केला आहे.

दरम्यान, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झेंडा फडकवल्यानंतर देशभरातील सर्वच ठिकाणी ध्वजारोहण झाले. यंदा कर्तव्यपथावर दैदिप्यमान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून राष्ट्रपदी द्रौपदी मुर्मूंसह पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्रपती इमैनुएल मैक्रों यांच्यासह दिगग्जांची उपस्थिती आहे. यंदा प्रजासत्ताक दिनाची थीम 'इंडिया इज अ मदर ऑफ डेमोक्रेसी' आहे. याचा अर्थ 'भारत लोकशाहीची जननी आहे'. याच कारणामुळे यावेळी प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये ८० टक्के महिला आहेत. संपूर्ण परेडमध्ये कर्तव्याच्या मार्गावर महिला शक्तीचे वर्चस्व असणार आहे.

## महाराष्ट्र हे देशाचं ग्रोथ इंजिन, गेल्या दीड वर्षांत..., मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा!

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

देशात आणि राज्यात आज ७५ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वर्षा निवासस्थानावर ध्वजावंदन केले. त्याआधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्यातील नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या ९ वर्षातील कामाचे कौतुक केले. त्याशिवाय राम मंदिरावरही भाष्य केले. तसेच देशाच्या प्रगतिमध्ये महाराष्ट्राचं



योगदान महत्वांचे असल्याचे सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रथम छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजश्री छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह सर्व क्रांतिकारकांना यांना विनम्र अभिवादन केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढे म्हटले की, महाराष्ट्र हे या देशाचं ग्रोथ इंजिन आहे. हे स्थान टिकवण्यासाठी मागील दीड वर्षांच्या काळात महायुती सरकारने आपलं कर्तव्य जबाबदारीने पार पाडलं, हे मी अभिमानाने या ठिकाणी सांगू इच्छितो. सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, सांस्कृतिक क्रीडा या सर्वच आघाड्यांवर महाराष्ट्राने आपली छाप टाकण्यास सुरुवात केली.

महाराष्ट्रात एक छोटा भारत वसलेला आहे असा आपण म्हणतो आणि त्यामुळेच भारताच्या प्रगतीची पताका डौलाने फडकत ठेवण्यासाठी आपली एकजूट महत्वाची आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. तसेच, भारत हा संपूर्ण विश्वात स्वतःचे स्थान निर्माण करण्यात यशस्वी होत आहे. याचे निर्वाद श्रेय देशाचे आदरणीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांना द्यायलाच पाहिजे. गेल्या नऊ वर्षात देशाने आपली मोहर जगावर उमटवली आहे. महाराष्ट्र देखील देशाच्या प्रगतीत आपले बहुमूल्य योगदान दिल्याशिवाय राहणार नाही. हे मी ठामपणे सांगू इच्छितो, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले.महाराष्ट्रात विकासाचा एक नवं पर्व आले. कृषी, शिक्षण, आरोग्य, उद्योग, पायाभूत सुविधा यामध्ये आपण मोठी झेप घेत आहोत. महाराष्ट्रला देशात क्रमांक एक राज्य बनवण्याची शपथ घेऊयात, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

## आजच्या रात्रीपर्यंत आम्हाला अध्यादेश द्या, मनोज जरांगेंची सरकारकडे मागणी

### महाराष्ट्रातील एकही मराठा आरक्षणाविना राहणार नाही

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक मुंबई वाशी**

मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील आणि सरकारचे शिष्टमंडळ यांच्यामध्ये जवळपास दोन तास चर्चा झाली. बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा झाल्याचं सांगण्यात आलं. शिष्टमंडळासोबतच्या भेटीनंतर जरांगे पाटील यांनी वाशीतील शिवाजी चौकात सभा घेतली. यावेळी त्यांनी सरकारचा जीआर समाज बांधवांना वाचून दाखवला. तसेच सरकारने मान्य केलेले मुद्दे समोर मांडले.



जरांगे पाटील यांनी सरकारला आज रात्रीपर्यंतची मुदत दिली आहे. आज रात्रीपर्यंत त्यांनी सगेसोयरे यांना देखील आरक्षण मिळण्यासाठीचा अध्यादेश काढण्याच्या सूचना दिल्या आहेत. अन्यथा उद्या आझाद मैदानाकडे कूच करु कशी भूमिका जरांगे पाटील यांनी घेतली आहे. आरक्षण मिळालं नाही तरी आझाद मैदानात जाणार, तसेच आरक्षण दिलं तरी वियजाचा गुलाल उधळण्यासाठी आझाद मैदानात जाणार, असं ते म्हणाले.सरकारसोबत चर्चा झाली. त्यांचे मंत्री आले नव्हते. सचिव आले होते. सारासार निर्णय घेऊन ते आपल्यापर्यंत आले होते. नोंदी देण्यासाठी गावागावत शिबिर सुरु करण्यात येणार आहेत. ५४ लाख मराठ्यांना प्रमाणपत्र मिळतीलच. ज्यांच्या नोंदी मिळाल्या त्यांच्या सर्व परिवाराला देखील प्रमाणपत्र देण्यात यावे. अशा २ कोटी मराठ्यांना प्रमाणपत्र मिळू शकते, असं पाटील म्हणाले.

**आतापर्यंत ३७ लाख लोकांना प्रमाणपत्र**

सर्वांना प्रमाणपत्र मिळावे यासाठी समिती नेमल्याचा एक शासन निर्णय मला देण्यात आला आहे. प्रमाणपत्र वाटप सुरु आहे. नोंदी मिळाल्यास अर्ज करण्याची जबाबदारी आपली आहे. त्यामुळे अशा मराठ्यांनी अर्ज करावा. सरकारनं सांगितलंय की ३७ लाख लोकांना प्रमाणपत्र देण्यात आलं आहे. त्याची यादी मला दिली आहे, असं ते म्हणाले.शिंदे समिती बरखास्त करु नका असं मी सांगितलं आहे. त्यांनी समितीची मुदत दोन महिन्यांनी वाढवली आहे. ज्याच्याकडे प्रमाणपत्र आहे, त्यांच्या सगेसोयऱ्यांना देखील प्रमाणपत्र मिळावं अशी आमची मागणी आहे. नोंद असलेल्या बांधवाने नोंद नसलेल्या बांधवासाठी शपथपत्र द्यायचं. त्यावरुन त्याला प्रमाणपत्र देण्यात यावं, अशी मागणी त्यांनी केली.

**सर्व गुन्हे मागे घ्यावेत**

आंतरवालीसह महाराष्ट्रातील मराठ्यांवरील सर्व गुन्हे मागे घ्यावेत अशी मागणी केली आहे. यासंदर्भात आम्हाला सरकारकडून पत्र हवं आहे. सुप्रीम कोर्टात जी क्युरेटिव्ह पिटिशन दाखल आहे. तेथून आरक्षण मिळेपर्यंत एखादा मराठा मागे राहत असेल तर तोपर्यंत मराठा समाजाला सर्व शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षण मोफत करावं. आरक्षण मिळेपर्यंत भरती करण्यात येऊ नये किंवा आमच्या जागा सोडून भरती करण्यात यावी, अशी मागणी जरांगेंनी केली.राज्यातील मुलींना केजी टू पीजी शिक्षण मोफत देण्याचा आदेश निर्गमित करण्यात आला आहे. पण, मुलांचं काय? कोपर्डीच्या मुद्द्याबाबत आदेश काढल्याचं सरकारनं सांगितलं आहे. आरक्षणाच्या अध्यादेशासाठी आपण इथे आलो आहोत. मराठवाड्यात कमी नोंद सापडल्या आहेत. पण, जशा-जशा नोंदी सापडत आहेत तसे प्रमाणपत्र देण्यात यावेत. सर्व सगेसोगऱ्यांना प्रमाणपत्र मिळेपर्यंत मी आता थांबणार नाही, असं जरांगे म्हणाले.

**आज रात्री अध्यादेश द्या**

आम्हाला मुंबईत यायची हौस नव्हती. आम्ही काम करणारी माणसं आहोत. पण, सर्व सगेसोयऱ्यांना आरक्षण देण्याचा अध्यादेश अद्याप दिला नाही. आजच्या रात्रीत तुम्ही सगेसोयऱ्यांना आरक्षण देण्याचा अध्यादेश आम्हाला द्यावा. आजची रात्र इथेच काढतो. तोपर्यंत सरकारचे अध्यादेश काढावा. जोपर्यंत पूर्ण आरक्षण मिळत नाही तोपर्यंत मागे जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका जरांगेंनी घेतली आहे. त्यामुळे अद्याप तोडगा निघालेला नाही. उद्यापर्यंत मराठा बांधव वाशीमध्येच मुक्काम ठोकतील.माझं उपोषण आज सकाळी ११ वाजल्यापासून सुरु झालं आहे. सरकारने माझ्यासमोर ज्या गोष्टी, कागदपत्रं ठेवले आहेत. ते तुमच्यासमोर मांडणार आहे. तुमच्या कानावर या गोष्टी घालायच्या आहेत. मी असाच रिकाम्या हाताने परत जाणार नाही, असं जरांगे यावेळी म्हणाले.

## नितीश कुमार यांचं एनडीए मध्ये जाणं निश्चित

### २८ जानेवारीला शपथविधी, सुशील मोदींकडे उपमुख्यमंत्रिपद?

**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताक पाटणा**

बिहारच्या राजकारणामध्ये पुन्हा एकदा मोठी उलथापालथ होताना दिसत आहे. भाजपाशी असलेली आघाडी तोडून महाआघाडीत गेलेले नितीश कुमार परत एकदा माघारी फिरण्याच्या तयारीत असून, राज्यात नवं सरकार स्थापन करण्याच्या हालचारी सुरू झाल्या आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नितीश कुमार एनडीएसोबत सरकार स्थापन करणार असून, ते २८ जानेवारी रोजी ९ व्यांदा बिहारच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेऊ शकतात. त्यांच्यासोबत सुशील कुमार मोदी यांना उपमुख्यमंत्री बनवले जाण्याची शक्यता आहे.



नितीश कुमार यांच्या जनता दल युनायटेड पक्षाने आपल्या सर्व आमदारांना पाटणामध्ये बोलावले आहेत. तसेच जेडीयूकडून सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. २८ जानेवारी रोजी पाटणामध्ये महाराणा प्रताप रॅली होती, ही रॅलीसुद्धा रद्द करण्यात आली आहे. तर भाजपाचे बिहारमधील सर्व प्रमुख नेते हे हायकमांडसोबत बैठकांवर बैठका घेत आहेत. एनडीएतील मित्रपक्षांच्या नेत्यांसोबतही चर्चा केली जात आहे.

भाजपा आणि नितीश कुमार यांच्यामध्ये डील फायनल झाली असल्याचे सांगण्यात येत आहे. नितीश यांना पुन्हा सोबत घेण्यास भाजपा तयार आहे. तसेच दोन्ही पक्षांमध्ये नव्याने होत असलेल्या आघाडीबाबत वेगवेगळे फॉर्म्युले समोर येत आहेत. त्यातील एका फॉर्म्युल्यानुसार विधानसभा भंग केली जाण्याची शक्यता आहे. तसेच नितीश कुमार यांना पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपद देण्यासाठी भाजपा तयार असल्याचेही सांगण्यात येत आहे. तसेच हा फॉर्म्युल्या जवळपास मान्य झाल्याचेही सांगितले जात आहे.

भाजपामधील सूत्रांकडून मिळत असलेल्या माहितीनुसार नितीश कुमार यांच्याकडे नेतृत्व सोपवले जाऊ शकते. लोकसभा निवडणुकीपर्यंत नितीश कुमार यांच्याकडे नेतृत्व दिले जाईल. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे स्वत: भाजपाकडून संपूर्ण मोहिमेमध्ये गुंतले आहेत. या मुद्द्यावर गुरुवारी रात्री अमित शाह यांची भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्याशी चर्चा झाली. तसेच नड्डा यांनी आपला केरळ दौराही रद्द केला आहे. जीतनराम मांझी आणि चिराग पासवान या आपल्या सहकाऱ्यांसोबतही भाजपा सातत्याने चर्चा करत आहे.

## लोकसभेच्या तोंडावर ८०० किलोमीटरची यात्रा, ‘मातृतीर्थ ते शिवतीर्थ’ अभियानाची घोषणा

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

एकीकडे राजकीय मैदानात लोकसभेचे वारे वाहु लागले असतानाच ठाकरे गटाच्या नेत्यांवर मात्र ईडी कारवाईचा ससेमिरा सुरू झाला आहे. ठाकरे गटाचे बडे नेते सूरज चव्हाण सध्या अटकेत आहेत. तर किशोरी पेडणेकर, रविंद्र वायकर यांचीही चौकशी सुरू आहे. या कारवायांवरुन ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी शिंदे सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. तसेच मातृतीर्थ ते शिवतीर्थ मुक्त संवाद अभियानाचीही घोषणा केली.

ज्या पद्धतीने जनता न्यायालय पार पडले, मग सूडबुद्धीने या कारवाया सुरू झाल्या. वायकर साहेबांनी शिंदे गटाकडे जायचं ठरवलं असतं तर कारवाई बंद झाली असती. किशोरी पेडणेकर यांच्यावरदेखील सूडबुद्धीने कारवाई झाली, असे आरोप सुषमा अंधारे यांनी केले. तसेच राम सगळ्यांचे श्रद्धास्थान



आहेत. पण महाराष्ट्राचे प्रश्न बाजूला पाडतायत, असे म्हणत राममंदिरावरुनही अंधारेंनी भाजपवर निशाणा साधला.

**मातृतीर्थ ते शीवतीर्थ यात्रा...**


यावेळी सुषमा अंधारेंनी ३० तारखेपासून मातृतीर्थ ते शिवतीर्थ मुक्त संवाद अभियान सुरू होत असल्याची मोठी घोषणा केली. ३० जानेवारी ते ३ मार्च पर्यंत म्हणजे ३५ दिवस हे अभियान सुरू राहणार आहे. या अभियानाअंतर्गत ८३० किलोमीटरचे अंतर पार करत १३ लोकसभा २७ विधानसभा कव्हर केली जातील. तसेच ७० लाख लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न असेल, असे सुषमा अंधारे यांनी सांगितले आहे.या संपूर्ण अभियानात हॉटेल वगैरे अशा सुविधा न घेता टेंटमध्ये राहणार आहे. स्वतः बनवून खाणार असून बुलढाणा, सिंदखेड राजा, रीसोल, वाशिम, हिंगोली, परभणी असा दौरा करत मुंबईपर्यंत येणार आहे. तसेच समारोपाच्या दिवशी समारोप सभेला. उद्धव ठाकरे उपस्थितीत असतील. या दौऱ्यात संजय राऊत, आदित्य ठाकरे, भास्कर जाधव यांच्याही सभा अधूनमधून होतील, असे सुषमा अंधारे यांनी स्पष्ट केले आहे.

## ...तर ओबीसींचंही आंदोलन सुरू होईल, जरांगे पाटील मुंबईच्या सीमेवर असताना भुजबळांचा इशारा

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

मराठा समाजाला सरसकट कुणबी दर्जा देऊन ओबीसी कोट्यातून आरक्षण द्यावे, अशी मागणी करत मनोज जरांगे पाटील यांच्यासह लाखो मराठा आंदोलकांनी मुंबईच्या सीमेवर धडक दिली आहे. मराठा आरक्षणासाठी जरांगे पाटील यांनी आज सकाळी ११ वाजल्यापासून उपोषणालाही सुरुवात केली आहे. दरम्यान, मराठा आरक्षणाचा निर्णय घेताना ओबीसींवर अन्याय झाल्यास, ओबीसींचंही आंदोलन सुरू होईल, असा इशारा राज्य सरकारमधील मंत्री आणि ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी दिला आहे.

मुंबईत धडकलेल्या जरांगे पाटील यांच्या आरक्षण आंदोलनावर प्रतिक्रिया देताना



छगन भुजबळ म्हणाले की, ओबीसींवर अन्याय झाला असं लक्षात आलं. तर निश्चितपणे ओबीसींचं देखील आंदोलन सुरू होईल. त्यामुळे मला असं वाटतं की सरकार दोन्ही बाजूंचा विचार करून योग्य तो निर्णय घेईल. तसेच आमची जी काही मतं आहेत ती आम्ही सभेतून मांडतो आणि विरोधसुद्धा करतो. तसेच तो करत राहणार, असेही जरांगे पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, शिवसेना नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री दीपक केसरकर यांनी एक महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या सर्व मागण्या मान्य झाल्या आहेत. शासकीय नियमांनुसार त्यावर अंमलबजावणी होईल. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदा आपण ३७ लाख कुणबी प्रमाणपत्र दिले. आता आणखी देऊन ही संख्या ५० लाखांच्या वर जाणार आहे, असा दावा दीपक केसरकरांनी केला आहे. तर दुसरीकडे मराठा आंदोलकांनी आझाद मैदान येथे जमण्यास सुरुवात केली आहे. तसेच वाशी येथील शिवाजी चौकामध्ये ही जरांगे पाटील यांच्यासह मराठ्यांचा लाखोंच्या संख्येने जनसमुदाय जमला आहे.

## संपादकीय ......

# लोकनायक कर्पूरी ठाकूर

बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांना मरणोत्तर 'भारतरत्न' हा देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान देण्यात येणार आहे. दिवंगत समाजवादी नेतेयांच्या जयंतीच्या एक दिवस आधी, मंगळवारी राष्ट्रपती कार्यालयाने ही घोषणा केली. कर्पूरी ठाकूर यांना स्वातंत्र्यसैनिक, शिक्षक आणि राजकारणी म्हणून ओळखले जाते. ते बिहारचे दुसरे उपमुख्यमंत्री आणि दोन वेळा मुख्यमंत्री होते. साधी राहणी आणि मागासवर्गीयांच्या उत्थानाची तळमळ असलेल्या ठाकूर यांच्या लोकप्रियतेमुळे त्यांना लोकनायक म्हटले गेले.

ते बिहारचे पहिले मुख्यमंत्री होते, जे बिगरकाँग्रेसी होते. २२ डिसेंबर १९७० रोजी त्यांनी पहिल्यांदा राज्याची सूत्रे हाती घेतली. त्यांचा हा कार्यकाळ केवळ १६३ दिवसांचा होता. नंतर १९७७ च्या जनता लाटेत जनता पार्टीला मोठा विजय मिळाला तेव्हाही कर्पूरी ठाकूर दुसर्यांदा बिहारचे मुख्यमंत्री झाले. दुर्दैवाने तोही कार्यकाळ त्यांना पूर्ण करता आला नाही. जनसंघाचा विरोध डावलून त्यांनी बिहारमध्ये एकस्तरित २६ टक्के आरक्षण लागू केले होते.त्यानुसार ओबीसींना १२ टक्के, ओबीसींमधील आर्थिक मागासांना ८ टक्के, महिलांना ३ टक्के आणि उच्च जातींमधील आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांना ३ टक्के आरक्षण अशी तरतूद त्यांनी केली होती. त्यांनी रचलेल्या आरक्षणाच्या या पायावर पुढे बिहारमध्ये राजकारण रंगले. अगदी अलीकडे याच बिहारमध्ये जातनिहाय जनगणना करण्यात आली. त्यानुसार राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी एकूण ६३ टक्के लोक हे मागासवर्गातील आहेत. यापैकी २७.१२ टक्के मागासवर्गीय, अतिमागासवर्गीय ३६.०१ टक्के, अनुसूचित जाती-जमातीची लोकसंख्या सुमारे २० टक्के आहे. हेच गणित मांडून भाजपने बिहारचे मुख्यमंत्री आणि जनता दल युनायटेडचे नेते नितीश कुमार यांना शह दिल्याचे मानले जाते.एकूणच भाजपने जातीची समीकरणे ध्यानी घेऊन लोकसभेची रणनीती आखल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. याआधी भाजपने छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदी नव्या चेहर्यांना संधी देऊन सर्वांनाच धक्का दिला होता. छत्तीसगडमध्ये विष्णू देव साय, मध्य प्रदेशात डॉ. मोहन यादव आणि राजस्थानमध्ये भजनलाल शर्मा यांची मुख्यमंत्रीपदासाठी निवड केली. याद्वारे त्यांनी प्रस्थापितांच्या राजकारणाला सुरूंग तर लावलाच, शिवाय जातीची गणितेही सांभाळली. विष्णू देव साय आदिवासी असून छत्तीसगडसह झारखंड आणि ओडिशा ही आदिवासीबहुल राज्ये आहेत. राजस्थानमध्ये भजनलाल शर्मा यांच्याद्वारे ब्राह्मण चेहरा समोर आणला. या राज्यात ब्राह्मणांची संख्या ८ ते ९ टक्के आहे.

ओबीसी चेहरा असलेले डॉ. मोहन यादव यांना मुख्यमंत्री करून मध्य प्रदेशातील ५२ टक्के ओबीसी तसेच उत्तर प्रदेश आणि बिहारसह अन्य राज्यांतील यादवांची मतेही मिळविण्याची दूरदृष्टी भाजपने दाखविली. दक्षिण भारतातून फारशी आशा नसलेल्या भाजपने अशा रीतीने उत्तर भारतावर लक्ष केंद्रित केल्याचे दिसते. भाजप असे निर्णय घेत असताना विरोधकांची आघाडी असलेल्या इंडियाला तडे पडण्यास सुरुवात झाली आहे. तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी आणि आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी घेतलेल्या भूमिका भाजपच्याच पथ्यावर पडणार आहेत. त्यामुळे 'अब की बार ४०० पार, तीसरी बार मोदी सरकार' ही घोषणा वास्तवात उतरण्याचीच चिन्हे आहेत.

# जिल्हास्तरीय भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेत जरूड ग्रामपंचायत प्रथम



**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताकअमरावती,** १५अटल भूजल योजनेंतर्गत भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक जरुड ता.वरुड, द्वितीय क्रमांक झटामझरी ता.वरुड तर तृतीय क्रमांक अंबाळा ता. मोर्शी यांना जाहिर झाला आहे, अशी माहिती भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक राजेश सावळे यांनी दिली.

अमरावती जिल्ह्यात चांदूर बाजार, मोर्शी व वरुड तालुक्यातील एकूण ९३ ग्रामपंचायती अटल भूजल योजनेत समाविष्ट आहे. त्यातील सन २०२२-२३ मध्ये २७ ग्रामपंचायतीने भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यामध्ये तीन ग्रामपंचायतींची निवड झाली असून प्रथम क्रमांक जरुड ता.वरुड ५० लाख रुपये, द्वितीय क्रमांक झटामझरी ता.वरुड ३० लाख रुपये तर तृतीय क्रमांक अंबाळा ता. मोर्शी २० लाख रुपये पारितोषीक जाहिर झाले आहे.

लोकसहभागाद्वारे भूजलाचे संनियंत्रण करणे, जलसुरक्षा आराखडा तयार करणे व त्यामध्ये समाविष्ट कामांची अंमलबजावणी करणे, राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांचे अभिसरण होणे, यासाठी ग्रामस्तरावर सुदृढ वातावरण निर्मितीसाठी अटल भूजल योजनेचे प्रमुख उद्दीष्ट आहे. या योजनेत समाविष्ट ग्रामपंचायतीनी सन २०२३-२४ साठी भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेत जास्तीत जास्त सहभाग घेण्याचे आवाहन वरिष्ठ भूवैज्ञानिक राजेश सावळे यांनी केले आहे.

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार २०२२-२३; क्रीडा पुरस्कारासाठी सुधारीत नियमावलीनुसार अर्ज आमंत्रित

**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,-** शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, जिजामाता, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार खेळाडू, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार दिव्यांग खेळाडू, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार साहसी उपक्रम या पुरस्कारांच्या नियमावलीत सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार इक्वेस्ट्रियन, गोल्फ, यॉटींग, पॉवरलिफ्टींग, बॉडीबिल्डींग, कॅरम, बिलियर्डस् ॲण्ड स्नूकर, सॉफ्टबॉल पुरुष व बेसबॉल महिला आणि जिम्नॅस्टिक्स एरोबिक्स, ॲक्रोबॅटिक्स या खेळांचा समावेश करण्यात आले आहे. या खेळासाठी सुधारीत नियमावलीनुसार दि. ३१ जानेवारीपर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले आहे.

सुधारीत नियमावलीनुसार पुरस्काराकरीता पात्र क्रीडा प्रकारांच्या यादीनुसार पुरस्काराकरीता अर्ज मागविण्यात आले आहेत. यातील पात्र क्रीडा प्रकारांच्या यादीमध्ये शासनाने दि. २५ जानेवारी, २०२४च्या शासन निर्णयानुसार सुधारणा केली आहे.



शासनाच्या दि. २९ डिसेंबर २०२३ रोजीचा शासन निर्णयानुसार इक्वेस्टरियन, गोल्फ, यॉटींग, पॉवरलिफ्टींग, बॉडीबिल्डींग, कॅरम, बिलीयर्डस ॲन्ड स्नूकर, सॉफ्टबॉल पुरुष व बेसबॉल महिला या खेळांचा समावेश करण्यासय व मॉडर्न पेंटॅथलॉन या खेळामध्ये गुणांकन करताना टेट्राथलॉन या उपप्रकाराचा विचार शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार २०२२-२३ मध्ये करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

पुरस्काराकरीता विहित केलेला अर्ज क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे दि. ३१ जानेवारी, २०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. अर्ज स्वीकारण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे कार्यालय कार्यालयीन वेळेत सुट्टीच्या दिवशी देखील सुरु ठेवण्यात येणार आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी कळविले आहे.

# राष्ट्रीय मतदार दिवस उत्साहात साजरा

## सुदृढ लोकशाहीसाठी मतदान प्रक्रियेत सहभाग वाढावा- जिल्हाधिकारी







**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** आगामी निवडणुकीत मतदारांनी मतदान प्रक्रियेत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन जिल्ह्याचा मतदानाचा टक्का वाढवावा. सुदृढ लोकशाहीसाठी मतदान प्रक्रियेत नवमतदार व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

१४ व्या राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त छत्रपती शिवाजी सभागृह, मोर्शी रोड अमरावती येथे मतदार जनजागृती व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अपर जिल्हाधिकारी सुरज वाघमारे, पोलीस अधीक्षक विशाल आनंद शिंगुरी, मनपा आयुक्त देवीदास पवार, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उपायुक्त संजय पवार, उपजिल्हाधिकारी रणजित भोसले, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठचे निबंधक तुषार देशमुख, उप जिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, तहसिलदार विजय लोंखडे आदी यावेळी उपस्थित होते. श्री. कटियार म्हणाले की, निवडणूकीत घटत असलेले मतदानाचे प्रमाण चिंतेचा विषय असून मतदान शतप्रतिशत व्हावे यासाठी प्रशासनाव्दारे अनेक उपक्रम राबविण्यात येत आहे. आगामी काळात लोकसभा व विधानसभा निवडणूक होणार आहेत. या निवडणुकीत मतदार व नवमतदारांनी मतदान प्रक्रियेत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन जिल्ह्याचा मतदानाचा टक्का वाढवावा. तसेच नवमतदारांना मतदानाचा हक्कासोबत त्यांना त्यांच्या कर्तव्याप्रती जाणीव निर्माण व्हावी, यासाठी महाविद्यालयीन स्तरांवर प्रशासनाव्दारे विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. मतदानाच्या दिवशी अनेक नागरिक मतदानाबाबत विविध कारणांनी अनास्था दाखवून मतदान करीत नाहीत. त्या मतदारांना मतदानाविषयी महत्त्व पटवून दिले पाहिजे.

मतदारांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदानाचा हक्क निर्धास्तपणे बजवावा, असेही ते यावेळी म्हणाले.

मतदार नोंदणीत उत्कृष्ट काम करणारे प्रत्येक विधानसभा मतदार संघातून पर्यवेक्षक, मतदान केंद्र अधिकारी तसेच शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थी, जेष्ठ मतदार, उत्कृष्ट पत्रकार, भटक्या विमुक्त जमातीचे समाजसेवक यांचे सत्कार यावेळी करण्यात आले. तसेच १८ वर्षावरील मतदान नोंदणी केलेल्या युवक-युवतींना मान्यवरांच्या हस्ते मतदाराचे ओळखपत्र वितरित करण्यात आले.

उप जिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी मतदानाचे महत्त्व याबाबत उपस्थिताना प्रास्ताविकेतून माहिती दिली. मतदार नोंदणी ही निरंतर प्रक्रिया असून नवीन मतदारांची नोंदणी निवडणूक आचारसंहिता लागू होईपर्यंत सुरु आहे. याचा लाभ नवमतदारांनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.कार्यक्रमाचे संचालन शिप्रा मानकर यांनी तर आभार उपजिल्हाधिकारी रणजित भोसले यांनी मानले.-

### मतदार जनजागृती रॅलीला जिल्हाधिकाऱ्यांनी दाखविली हिरवी झेंडी

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आज शहरातून मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीला जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून इर्विन चौक येथून मार्गस्थ करण्यात आले. या रॅलीमध्ये मोबाईल प्रात्यक्षिक व्हॅन, मतदार जनजागृती रथ, बॅनर व विद्यार्थ्यांव्दारे मतदार जनजागृतीपर घोषणा देत रॅली मोर्शी रोड मार्गे छत्रपती शिवाजी सभागृह येथे पोहचली. या रॅलीमध्ये शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी व नवमतदार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी उपस्थिताना मतदार दिनाची शपथ देण्यात आली.




## मुलांना अशा प्रकारे लावा अभ्यासाची गोडी

दि.२५ विदर्भ प्रजासत्ताक

बऱ्याच मुलांना अभ्यास करायचा कंटाळा येतो किंवा ते टाळाटाळ तरी करतात. अशावेळी, पालकांना त्यांच्या भविष्याची चिंता सतावते. सोबत मुलांना अभ्यासाची गोडी कशी लावायची हा प्रश्न देखील भेडसावतो. तुमचेही मूल असे करत असेल तर ही बातमी पूर्ण वाचा.

**अभ्यास करताना मुलांसोबत बसा -** मुलांना अभ्यास करताना प्रोत्साहित करण्याचा सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे त्याच्या बाजूला बसणे आणि त्याची स्तुती करणे. आपण जे काही करतो त्यामुळे आपली वाहवा होत आहे हे कोणत्याही मुलासाठी प्रेरणा असते. त्यामुळे जेव्हा तुमचा मुलगा किंवा मुलगी अभ्यासाला बसेल तेव्हा त्याच्यासोबत अभ्यासला बसा. याने तुमचे पाल्य मन लावून अभ्यास करू लागतील शिवाय तो कसा अभ्यास करत आहे हे सुद्धा तुम्हाला कळेल.

**प्रेशर देऊ नका-**दमदाटी करून अभ्यासाला बसविणे किंवा मुलांवर अभ्यासाचे प्रेशर दिल्याने मुलं अभ्यासापासून दूर जाऊ शकतात. तसेच मुलांच्या मनावर अपेक्षांचं ओझं तयार होते. आपण चांगले मार्क्स मिळविले नाही तर आई-बाबा आपल्याला ओरडतील किंवा मारतील अशी भीती मुलांच्या मनात तयार होते. मुलांना मानसिक दडपण येऊ लागते. परिणामी, मुलांचा अभ्यासातील रस वाढण्याऐवजी कमी होतो.

मुलांची इतरांशी तुलना करू नका -

अनेक पालक मुलांच्या मार्क्सवरून मुलांची इतर मुलांशी तुलना करतात. ज्याचा मुलांच्या मनावर खोलवर परिणाम होतो. शिवाय त्याचा परिणाम असाही दिसून येतो की, मूल अभ्यासातून माघार घेऊ लागते. त्यामुळे पालकांनी तुमच्या मुलांची तुलना इतर कोणाशीही करू नये. त्याऐवजी, तुम्ही दुसऱ्याचे उदाहरण देऊन त्यांना प्रेरित करू शकता.

**मुलांचीही बाजू समजून घ्या -**
कधीही मुलांवर आपलं बोलणे थोपवू



नका. त्यांचं म्हणणं सुद्धा ऐका. कधी कधी मुलांना खरंच अभ्यास करायचा कंटाळा येत असेल तर अशावेळी दमदाटी करून, मारून मुलांना अभ्यासाला बसविण्यात काहीच अर्थ नाही कारण जबरदस्तीने मुलांना अभ्यासाला बसविल्याने तो जो अभ्यास करेल तो त्याच्या लक्षात राहणार नाही. त्यामुळे कधी मुलांना कंटाळा आला तर काही वेळ त्याला त्याच्या आवडीची गोष्ट करू द्या आणि काही वेळाने पुन्हा अभ्यासाला बसावा.

**तुमच्या मुलाची लक्षात ठेवण्याची क्षमता समजून घ्या-**

तुमच्या पाल्याची समजून घेण्याची आणि लक्षात ठेवण्याची क्षमता समजून घेण्याचा प्रयन्त करा. त्यानुसार मुलांचा अभ्यास घ्या.

# अस्वलाच्या हल्ल्यात शेतकरी गंभीर

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक-** चिखलदरा :शेतशिवारात गुरे चराई करीत असलेल्या एका शेतकऱ्यावर अस्वलाने अचानक हल्ला चढविला. या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी झाला. ही घटना गुरुवार, २५ जानेवारी रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास घडली. बालाजी सोमा बेठेकर (४०) रा. चोबीता असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. शेतशिवारात गुरे चराई करताना अस्वलाने अचानक त्यांच्यावर हल्ला चढविला.त्यात त्यांच्या डाव्या हात आणि डोक्यावर दुखापत झाली. त्यांना प्राथमिक उपचारासाठी चुरणी येथील ग्रामीण रुग्णालय दाखल करण्यात आले होते. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना अमरावतीतील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले आहे. आठ दिवसांपूर्वी हतरू परिसरात हिंस्त्र प्राण्याने एका गुराख्यावर हल्ला करून त्याला ठार केले होते. त्यानंतर गुरुवारी ही घटना घडली.

# पशुधनाची ऑनलाईन टॅगिंग व नोंदणी झाली सुलभ नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात नोंदणी करा

**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताकअमरावती,** ११शासनाने जाहीर केलेले दूध अनुदान दूध उत्पादक शेतकऱ्यास मिळण्यासाठी जनावरांचे टॅगिंग होणे महत्त्वाचे आहे. पशुधनाची नोंदणी व टॅगिंग करणे आता सुलभ झाले असून नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क करून पशुधनाची टॅगिंग व नोंदणी प्रक्रिया पुर्ण करावी, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. संजय कावरे यांनी केले आहे. त्याअनुषंगाने सर्व पशुवैद्यकीय संस्थामार्फत पशुधनास टॅगिंग व भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी प्रक्रीया सुरू आहे. या पशुधनास टॅगिंग व नोंदणीस शेतकरी पशुपालकांचे उत्स्फूर्त



प्रसिसाद मिळत असून आज अखेर पशुधन नोंदणी ५.७३ लक्ष, पशुपालक नोंदणी १.९६ लक्ष, पशुपालक हस्तांतरण नोंदणी ३.२०लक्ष, पशुधनाच्या नोंदीत बदल १.८४ लक्ष, कानातील टॅग बदल नोंदी ५ हजार ७९५, पशुपालकांच्या नावातील बदल ५० लक्ष, तसेच अतिरिक्त ५६ लक्ष टॅग नव्याने उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पशुधनास टॅगिंग व भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी करण्यासाठी अभियान राबविण्यात येत आहे

# जयंत राऊत यांना राष्ट्रपती पोलिस पदक



**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** मुळचे अमरावतीचे व सध्या नाशिक येथील महाराष्ट्र पोलिस अकॅडमीत वरिष्ठ पोलिस निरीक्षक तथा सहाय्यक संचालक पदावर कार्यरत जयंत वासुदेवराव राऊत यांना राष्ट्रपती पोलिस पदक गुरूवारी जाहीर झाले.अठ्ठावीस वर्षाच्या उल्लेखनीय सेवेबद्दल हे पदक जाहीर करण्यात आले. त्यांनी मुंबई शहर, बुलडाणा जिल्हा, अमरावती ग्रामीण, अमरावती शहर, गडचिरोली येथे सेवा कालावधीत अनेक उल्लेखनीय कार्य केले तसेच बॉम्ब डीटेक्शन आणि डिस्पोजल स्कॉडमध्ये केलेल्या कामगिरीबाबत यापूर्वी त्यांना सन्मानित करण्यात आले होते. याबरोबरच ते उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून ओळखले जातात त्यांच्या प्रशिक्षणा अंतर्गत राष्ट्रीय स्तरावर अनेक अंमलदारांना सुवर्ण, रजत पदक प्राप्त झालेले आहेत. त्यांच्या सेवाकाळात त्यांना साडेतीनशे पेक्षा अधिक बक्षिसांनी सन्मानित करण्यात आले आहे. बॉम्ब डीटेक्शन मधील तज्ञ म्हणून त्यांची एक वेगळीच ओळख पोलिस खात्यात निर्माण झाली आहे.

# अंबानगरीत हजारो भाविकांनी केले विजयग्रंथाचे सामूहिक वाचन शिवसेनेचे आयोजन

## महाप्रसादाने पारायण सोहळ्याची सांगता











### मंदिर संस्थान अध्यक्ष व विश्वस्तांचा सत्कार

श्री विजयग्रंथ सामुहिक पारायण सोहळ्याच्या शेवटी अमरावतीमधील विविध मंदिर संस्थानचे अध्यक्ष आणि विश्वस्त सर्वश्री भागवताचार्य पांडुरंग कट्यारमल ,किशोर वडनेरे ,जयंत दलाल ,अजयराव जगताप ,ज्योतीताई कराळे ,मंगलाताई कावरे,पवार साहेब, शरद दातेराव यांचा विजय ग्रंथ वाचक डॉक्टर गजानन खासनीस आणि कार्यक्रमाचे आयोजक सुनील खराटे यांच्या हस्ते शाल ,श्रीफळ, स्मृतीचिन्ह व प्रसाद देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे संचालन प्रमोद कराळे गुरुजी यांनी केले.-

**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** शवसेनाप्रमुख हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती महोत्सवानिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या श्री विजयग्रंथ सामूहिक पारायण सोहळ्यात जिल्ह्यातीलच नव्हे तर बाहेर जिल्ह्यातून आलेल्या हजारो गजानन भक्तांनी उस्फूर्तपणे सहभागी होत विजयग्रंथाचे सामूहिक वाचन केले. तब्बल सात तास चाललेल्या सोहळ्याची सांगता गजाननाच्या जयघोषात महाप्रसादाने झाली.

शिवसेना अमरावती जिल्हा शाखेतर्फे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे जयंती महोत्सव आयोजित करण्यात आला असून या महोत्सवाचा एक भाग म्हणून २५ जानेवारी रोजी गुरुवारी साईनगर स्थित बेनाम चौकातील प्रांगणात भव्य दिव्य अशा श्री विजय ग्रंथ सामूहिक पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सोहळ्याच्या प्रारंभी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माजी अध्यक्ष शिवसेना उपनेत्या ज्योतीताई ठाकरे ,माजी खासदार अनंत गुढे,, माजी मंत्री जगदीश गुप्ता , आमदार प्रदीप वडनेरे , एडवोकेट आर बी अटल , नितीन वाट ,नांदेड़कर काका, शिवसेना पश्चिम विदर्भ महिला आघाडी समन्वयक आसावरीताई देशमुख ,जिल्हा संघटिका ज्योतीताई अवघड, मनीषाताई टेंबरे ,वर्षाताई भोयर ,प्रतिभा बोपशेट्टी ,माजी नगरसेवक प्रशांत वानखडे, दिनेश बूब,राजू भाऊ महल्ले ,धनंजय बंड,सोहळ्याचे आयोजक शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज ,संत गजानन महाराज ,बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण तसेच दीप प्रज्वलन करण्यात आले. यानंतर सोहळ्याचे आयोजक सुनील खराटे यांनी उपस्थित मान्यवर व भाविक भक्तांचे स्वागत करीत कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका आपल्या प्रास्ताविकातून विशद केली .त्यानंतर पारायण वाचक पुणे येथील डॉ.गजानन खासनीस यांचे स्वागत करून सत्कार करण्यात आला..

पूजा, मंत्रोच्चार, शंखनाद, प्रार्थना आदी विधी आटोपल्यानंतर श्री विजयग्रंथ वाचनास प्रारंभ झाला .डॉक्टर खासनीस यांनी आपल्या अमृतवाणीतून मुखोद्गत विजय ग्रंथाचे वाचन केले. सोबतच उपस्थित हजारो गजानन भक्तांनी विजय ग्रंथाचे वाचन केले. दोन टप्प्यात पार पडलेल्या पारायण सोहळ्याची सांगता आरती व महाप्रसादाने झाली .त्यानंतर उपस्थित हजारो भाविक भक्त व अमरावतीकरांनी महाप्रसादाचा लाभ घेतला .पारायण सोहळ्यासाठी भव्य दिव्य असा सभामंडप उभारण्यात आला होता तसेच पारायण करणाऱ्या भाविक भक्तांसाठी चहा,पाणी ,फराळ आदींची व्यवस्था कार्यक्रमस्थळी आयोजकांमार्फत करण्यात आली होती . यावेळी माजी नगरसेविका अर्चनाताई धामणे, जयश्री कुरेकर ,राजश्री जटाळे ,प्रकाश टेटू,विजय खंडारे आदी उपस्थित होते. तब्बल सात तास चाललेल्या या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी समस्त शिवसैनिक व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले

# भूमी अभिलेख उपअधीक्षक फुलझेले तडकाफडकी कार्यमुक्त

## प्रदेश भूमी उपसंचालकांची कारवाई फुलपगारे यांना अतिरिक्त कार्यभार

### बेकायदेशीर फेरफार व कोट्यवधींच्या फसवणुकीचे आरोप

अनिल फुलझेले यांच्यावर अमरावतीचे भूमी अभिलेख उपअधीक्षक म्हणून कार्यरत असताना काही बिल्डरांशी संगनमत करून शहरातील संपत्तीचे बेकायदेशीर फेरफार करून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली असल्याचा आरोप आहे. त्यांच्यावर आर्थिक फसवणुकीचे गुन्हे दाखल करून निलंबित करण्यात यावे. तसेच जमीन व आर्थिक घोटाळ्याची ईडी मार्फत चौकशी करण्याची मागणी एकता प्रॉपर्टी ब्रोकर्स असोसिएशनतर्फे करण्यात आली. यासाठी बुधवारपासून विभागीय आयुक्तालयावर आमरण उपोषण आंदोलन सुरू आहे.

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** –अमरावतीचे भूमी अभिलेख उपअधीक्षक अनिल फुलझेले यांना त्यांच्या पदावरून कार्यमुक्त करण्यात आले आहे. फुलझेले यांची ११ मे २०२३ रोजी अमरावती येथून उमरखेड येथे प्रशासकीय बदली झाली होती. परंतु त्यांनी या बदली विरोधात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट) मध्ये याचिका दाखल करून बदली आदेशाविरोधात स्थगनादेश मिळवला होता. गुरुवारी (ता.२४) मॅट न्यायाधिकरणाने सदर प्रकरण निकाली काढत फुलझेले यांनी त्यांच्या बदली विरोधात केलेला दावा अर्ज फेटाळून लावला. गुरुवारी मॅट न्यायालयाचा निकाल येताच अमरावती प्रदेश भूमी अभिलेख उपसंचालक डॉ. लालसिंह मिसाळ यांनी तडकाफडकी कारवाई करीत अमरावतीचे भूमी अभिलेख उपअधीक्षक अनिल फुलझेले यांना त्यांच्या पदावरून कार्यमुक्त जाहीर केले. त्यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार विशेष उपअधीक्षक महेश फुलपगारे यांना सोपवण्यात आला आहे.

# प्रख्यात दिग्दर्शक राजदत्त यांना पद्मभूषण

## एम. व्यंकय्या नायडू, वैजयंतीमाला, चिरंजीवी यांना पद्मविभूषण

## शंकरबाबा पापळकर, डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांना पद्मश्री





**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली** – प्रख्यात दिग्दर्शक राजदत्त यांना गुरुवारी पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाला. यासोबतच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शंकरबाबा पापळकर, नागपुरातील प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांना पद्मश्री जाहीर झाली आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते एम. व्यंकय्या नायडू (सार्वजनिक क्षेत्र), ज्येष्ठ अभिनेत्री वैजयंतीमाला (कला), प्रसिद्ध अभिनेते चिरंजीवी (कला), पद्मा सुब्रमण्यम (कला) यांना पद्मविभूषण जाहीर झाला आहे. बिंदेश्वर पाठक यांना मरणोत्तर पद्मविभूषण जाहीर झाला आहे. यासोबतच, न्या. एम. फातिमा बीवी (सार्वजनिक क्षेत्र), होरमुसजी एन. कामा (साहित्य, शिक्षण), अभिनेते मिथुन चक्रवर्ती (कला), सीताराम जिंदाल (उद्योग), यॉंग लियू (उद्योग), अश्विन मेहता (औषध), सत्यव्रम मुखर्जी (सार्वजनिक क्षेत्र / मरणोत्तर), माजी राज्यपाल राम नाईक (सार्वजनिक क्षेत्र), तेजस पटेल (औषधे), ओलांचेरी राजगोपाल (सार्वजनिक क्षेत्र), टोगदान रिम्पोचे (अध्यात्म/मरणोत्तर), संगीतकार प्यारेलाल शर्मा (कला), चंद्रेश्वर ठाकूर (औषध), उषा उथूप (कला), मरणोत्तर विजयकांत (कला), कुंदन व्यास (साहित्य) यांना पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.मुंबई येथील आंतरराष्ट्रीय मल्लखांब प्रशिक्षक उदय देशपांडे यांच्यासह महाराष्ट्रातील एकूण सहा जणांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. विविध क्षेत्रांतील एकूण ११० व्यक्तींना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. यात भारतातील पहिल्या महिला माहुत पार्बती बरुआ यांच्यासह जागेश्वर यादव (सामाजिक कार्य), चामी मूर्म(सामाजिक कार्य) गुरविंदर सिंग (सामाजिक कार्य), सत्यनाथन बेलेरी (कृषी), संघटनकिमा कार्य), हेमचंद्र मांझी (वैद्यकीय), दुखू मांझी (सामाजिक कार्य), के. चेल्लामल (कृषी), यामुंग जार्मोह लेगो (कृषी), सोमण्णा (सामाजिक कार्य), सर्वेश्वर बासूमतारी (कृषी), प्रेमा धनराज (आरोग्य), याझदी माणेकशा इटालिया (आरोग्य), शांतिदेवी पासवान आणि शिवान पासवान (कला), रतन कुमार (कला), अशोक कुमार बिस्वास (कला), बालकृष्ण सदानम पुथिया वितील (कला), उमा माहेश्वरी डी. (कला), गोपीनाथ स्वाइन (कला), स्मृती रेखा चकमा (कला), ओमप्रकाश शर्मा (कला) आदींचा समावेश आहे.

# झेंडा उचा रहे हमारा... शाळा, महाविद्यालये,संस्थांमध्ये डौलाने फडकला तिरंगा

**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – प्रजासत्ताक दिनाच्या ७५ व्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त शुक्रवारी २६ जानेवारीला शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालय, संस्था सोबतच ठिकठिकाणी प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून शासकीय इमारतींना तिरंग्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. शहरात ठिकठिकाणी राष्ट्रध्वज, स्टिकर्स, बॅचची मोठ्या प्रमाणात विक्री सुरू होती त्यामुळे शहरात तिरंगामय वातावरण निर्माण झाले होते.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आज सकाळी ठिकठिकाणी ध्वजारोहण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळा महाविद्यालय, शासकीय संस्था, निमशासकीय संस्था, विविध परिसरांमध्ये देशभक्तीपर गीतांसोबतच मोठ्या उत्साहात राष्ट्रध्वज फडकविण्यात आला.सारे जहाँ से अच्छा.. विजयी विश्व तिरंगा प्यारा... ए वतन ए वतन... यासारख्या अनेक देशभक्तीपर गीतांची प्रस्तुती करण्यात आली. शुक्रवारी संपूर्ण शासकीय कार्यालयांवर विदूत रोषणाईकरण्यात आली असून अनेक शासकीय कार्यालयांसोबतच खासगी इमारतींना सुद्धा तिरंगा स्वरूप रोषणाईने सजवण्यात आले आहे. यामध्ये शहरातील दोन्ही उड्डाणपूलांवरसुद्धा तिरंग्याची लाइटिंग लावण्यात आल्याने या ठिकाणी सेल्फी काढण्याचा मोह अनेकांना होत आहे.



### विभागीय कार्यालय

आज २६ जानेवारीला अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील सोलापूर येथील पालकमंत्री असल्याने त्यांच्या हस्ते सोलापूर येथे ध्वजारोहण करण्यात आले.

### जिल्हाधिकारी कार्यालय

जिल्हाधिकारी कार्यालयात येथे सकाळी आठ वाजता जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.ध्वजारोहण नंतर जिल्हाधिकारी यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्यात.

### महानगरपालिका

अमरावती महापालिके मध्ये आज २६ जानेवारीला सकाळी आठ वाजता मनपा आयुक्त देविदास पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. महापालिकेत ध्वजारोहणासंदर्भात सर्व तयारी गुरुवारीच करण्यात आली होती यावेळी महापालिकेचे सर्व अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापालिकेला तिरंग्याच्या रोषणाईने सजवण्यात आले आहे. याशिवाय शहरातील परकोटला सुद्धा रोषणाईने सजवण्यात आले आहे.

### जवाहर गेट

प्रजासत्ताक दिनाच्या पर्वावर जवाहर गेट येथे शहर काँग्रेसच्या वतीने ध्वजारोहण करण्यात आले. सकाळी नऊ वाजता आमदार माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांच्या हस्ते शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, प्रदेश प्रवक्ता मिलिंद चिमोटे, किशोर बोरकर यांच्या उपस्थितीत हे ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भाजप कार्यालय

राजापेठ भारतीय जनता पार्टी कार्यालय येथे ध्वजारोहण करण्यात येईल. भाजपा शहराध्यक्ष आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्या हस्ते सकाळी नऊ वाजता ध्वजारोहण करण्यात आले यावेळी भाजपचे सर्व पदाधिकारी संघटनेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# हव्याप्र मंडळाच्या चार खेळाडूंना सुवर्ण पदक

## नेपाळमध्ये एरोबिक्स अँड हिप हॉप स्पर्धा

**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** साऊथ एशियन एरोबिक्स अँड हिप हॉप चॅम्पियनशीप नुकतीच नेपाळमधील काठमांडू येथे पार पडल्या. यामध्ये अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या खेळाडूंनी दोन सुवर्ण तर दोन रजत पदक प्राप्त केले. या स्पर्धेमध्ये नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका, भूतान, भारत ई. देश सहभागी झाले होते. भारताकडून अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनचे सेंगकाम मारक, रोमित उरम, अभिनव कुमार, नोकरे मिडांसा हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

ह.व्या.प्र. मंडळाच्या एरोबिक्स प्रशिक्षक पल्लवी नारायण चिखलकर यांनी इंटरनॅशनल जज म्हणून जजबादारी पार पाडली. चारही खेळाडूंनी सिनियर कॅटेगिरीमध्ये हिप हॉप या क्रीडा प्रकारात सुवर्ण पदक तसेच फिटनेस एरोबिक्स या क्रीडा प्रकारात रजत पदक प्राप्त केले. या यशाबद्दल मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर यांच्यासह मंडळातील सर्व पदाधिकारी, प्राध्यापक, प्रशिक्षक, खेळाडू-विद्यार्थ्यांतर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.



# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला देशाला केलं संबोधित

## राम मंदिर आणि कर्पूरी ठाकूर यांचा उल्लेख

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली–** भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला गुरुवारी संध्याकाळी देशाला संबोधित केले. आपल्या भाषणात त्यांनी श्रीराम मंदिराचा उल्लेख केला आणि कर्पूरी ठाकूर यांनाही श्रद्धांजली वाहिली. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, ७५ व्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला मी तुम्हा सर्वांना हार्दिक शुभेच्छा देते. आपल्या प्रजासत्ताकाचे ७५ वे वर्ष अनेक अर्थाने देशाच्या वाटचालीतील ऐतिहासिक मैलाचा दगड आहे. आपला देश स्वातंत्र्याच्या शतकाकडे वाटचाल करत आहे आणि अमृत कालच्या सुरुवातीच्या टप्प्यातून जात आहे. हा कालखंडातील परिवर्तनाचा काळ आहे. प्रजासत्ताक दिन हा आपली मूलभूत मूल्ये आणि तत्त्वे लक्षात ठेवण्याचा एक महत्त्वाचा प्रसंग आहे. सह-अस्तित्वाची भावना भूगोलाद्वारे लादलेली नाही. १४० कोटींहून अधिक भारतीय एक कुटुंब म्हणून राहतात, आपल्या प्रजासत्ताका च्या मूळ भावनेने एकत्र राहतात. जगातील या सर्वात मोठ्या कुटुंबासाठी, सहअस्तित्वाची भावना भूगोलाने लादलेले ओझे नाही, तर सामूहिक आनंदाचा नैसर्गिक स्रोत आहे, जो आपल्या प्रजासत्ताक दिनाच्या उत्सवातून व्यक्त होतो, असंही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. यावेळी राष्ट्रपतींनी त्यांच्या अभिभाषणात बिहारचे माजी मुख्यमंत्री भारतरत्न कर्पूरी ठाकूर यांचाही उल्लेख केला आहे. त्या म्हणाल्या की, सामाजिक न्यायासाठी अविरत लढा देणाऱ्या कर्पूरी ठाकूरजींची जन्मशताब्दी काल पूर्ण झाली, हे मला नमूद करायचे आहे. कर्पुरीजी हे मागासवर्गीयांचे एक महान वकील होते, ज्यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य त्यांच्या कल्याणासाठी समर्पित केले. त्यांचे जीवन एक संदेश होते. कर्पूरीजींना त्यांच्या योगदानाने सार्वजनिक जीवन समृद्ध केल्याबद्दल मी त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या, 'दीर्घ आणि कठीण संघर्षानंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश परकीय राजवटीपासून मुक्त झाला. पण, त्या काळीही देशात सुशासनासाठी आणि देशवासीया च्या अंगभूत क्षमता आणि कलागुणांना मुक्तपणे वाव देण्या साठी योग्य मूलभूत तत्त्वे आणि प्रक्रिया तयार करण्याचे काम सुरू होते. संविधान सभेने सुशासनाच्या सर्व पैलूंवर सुमारे तीन वर्षे तपशीलवार चर्चा केली आणि आपल्या राष्ट्राचा, भारताच्या संविधानाचा महान पायाभूत मजकूर तयार केला. या दिवशी, आपण सर्व देशवासी त्या दूरदर्शी सार्वजनिक नेत्यांचे आणि अधिकाऱ्यांचे कृतज्ञतेने स्मरण करतो ज्यांनी आपल्या भव्य आणि प्रेरणा दायी संविधानाच्या निर्मितीमध्ये अमूल्य योगदान दिले.

### भाषणात श्रीराम मंदिराचा उल्लेख

यावेळी बोलताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या भाषणात राम मंदिराचा उल्लेख केला. राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या की, अयोध्येतील भगवान श्री राम जन्मस्थानी उभारण्यात आलेल्या भव्य मंदिरात स्थापन झालेल्या मूर्तींच्या अभिषेकाचा ऐतिहासिक सोहळा आपण सर्वांनी पाहिला आहे, भविष्यात या घटनेला व्यापक परिप्रेक्ष्यातून पाहिले जाईल, तेव्हा इतिहासकारांना भारताची आठवण होईल.



## 'त्या' उपोषणकर्त्याचा सुपरस्पेशालिटीत मृत्यू

### चारघड प्रकल्पग्रस्त : पुनर्मूल्यांकनाच्या मागणीसाठी करीत होते उपोषण

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी :** मालमत्ता पुनर्मूल्यांनाच्या मागणीसाठी उपोषण थाटणाऱ्या बोडणा ग्रामस्थांपैकी हरिचंद्र महादेव खांडेकर (६४) यांचा अमरावती येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाला. मोर्शी तहसील कार्यालयासमोर १६ जानेवारी रोजी त्यांच्यासह ग्रामस्थांनी उपोषण थाटले होते. १७ जानेवारी रोजी त्यांना वैद्यकीय उपचारासाठी हलविण्यात आले होते. विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटना, बोडणाच्या वतीने १६ जानेवारीपासून उपोषणाला प्रारंभ करण्यात आला. यादरम्यान प्रकृती खालावल्याने हरिचंद्र खांडेकर यांना १७ जानेवारी रोजी प्रथम मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. १८. जानेवारीला सकाळी ११ वाजता त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. यानंतर पुढील उपचारासाठी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. तेथे उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. हरिश्चंद्र खांडेकर यांच्या मृत्यूने प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे



## बहुप्रतीक्षित तापी मेगा रिचार्ज योजनेला गती मिळणार?

### बऱ्हाणपूरच्या आमदारांमुळे आशा पल्लवित

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताकधारणी :** मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राला विभाजित करणाऱ्या तापी नदीवरील बहुप्रतीक्षित तापी मेगा रिचार्ज योजना आता गती घेणार असल्याच्या चर्चेला उधाण आले आहे. दरम्यान, या योजनेबाबत मेळघाटात विरोधाचे सूर कायम आहेत, तर मध्य प्रदेशात सकारात्मकता आहे.

दोन राज्यांच्या सीमा दाखविणाऱ्या तापी नदीचे वाहून जाणारे पाणी महाकाय पुनर्भरण योजनांमार्फत जनविकासासाठी खेळविण्याचा निर्णय झाला होता. आमदार राजकुमार पटेल यांनी या योजनेचा जोरदार विरोध केल्यामुळे या योजनेची संपूर्ण बैठक मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर येथून सुरू करण्यात आली. या योजनेमध्ये कोणत्याही प्रकारे गावाला बुडीतमध्येघेण्यात येणार नसल्यामुळे पुनर्वसन करण्याचा शासनाचा विचार नसल्याची माहिती असली तरी ही योजना मेळघाटातील आदिवासी आणि इतर परंपरागत रहिवाशांसाठी धोकादायक ठरणार असल्याची भीती असल्याने विरोधाचे सूर उमटत असतात. या बहुप्रतीक्षित योजनेमध्ये मध्य प्रदेशातील तत्कालीन मंत्री आणि नव्याने निवडून आलेल्या आमदार अर्चना चिटणीस यांचे विशेष लक्ष असल्याने या प्रकल्पाला आता गती

मिळणार असल्याची शक्यता आहे

धारणी मधील खाऱ्या - घुटीघाट येथे हीयोजना राबविली जाणार असून याबाबत ७ मार्च २००९ रोजी इंदूर येथे उपसमितीची बैठक पार पडली होती. या बैठकीमध्ये धारणीतील खाऱ्या आणि मध्य प्रदेशातील घुटीघाट या दोन गावांदरम्यान असलेल्या जागेला पसंती मिळाली होती व त्यावरच शिक्कामोर्तब करण्यात आले. ४ ऑगस्ट २००९ रोजी मुंबईत दोन्ही राज्यातील जलसंपदा मंत्र्यांची संयुक्त बैठक घेण्यात आली होती. या बैठकीमध्ये डाव्या कालव्याचे सर्वेक्षण तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांच्यामार्फत करण्याचा निर्णय झाला होता, या प्रकल्पाचा अहवाल केंद्रीय भूजल मंडळाकडे सादर करण्याचा निर्णयसुद्धा झाला होता.–



# विद्यापीठाला यशोशिखरावर पोहचविणार - डॉ. मिलींद बारहाते

## नवनियुक्त कुलगुरूंनी स्वीकारली सूत्रे

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** संत गाडगे बाबांच्या नावाने असलेल्या अमरावती विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी माझ्या कुलगुरू पदाच्या कारकिर्दीत विद्यापीठाला यशोशिखरावर पोहोचविणार, असा मानस नवनियुक्त कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी व्यक्त केला. विद्यापीठाचे नववे कुलगुरू म्हणून महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती श्री रमेश बैस यांनी डॉ. बारहाते यांची निवड केली. आज त्यांनी कुलगुरू पदाचा पदभार विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी यांचेकडून स्वीकारला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे मावळते प्रभारी कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख उपस्थित होते. याप्रसंगी प्रभारी कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांनी नवनियुक्त कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांना कुलगुरू पदाचा पदभार हस्तांतरित केला. नवनियुक्त कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते कुलगुरू पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर पुढे म्हणाले, विद्यापीठासमोर अनेक आव्हाने आहेत. अनेक क्षेत्रात सुधारणांची गरज असून त्यासोबतच विकास सुद्धा महत्वाचा आहे. या विद्यापीठ परिक्षेत्रातील ग्रॉस एनरॉलमेन्ट रेशो वाढविण्याची आवश्यकता असून मेळघाटसारख्या दुर्गम भागातील जास्तीतजास्त विद्यार्थी उच्च शिक्षणात कसे येतील, यासाठी मी प्रयत्न करणार आहे. याशिवाय या भागात उपलब्ध नैसर्गिक संसाधनाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध व्हावा, याकरीता सुद्धा प्रयत्न करणार आहे.

शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण या भागात असून शेतकयांची स्थिती कशी सुधारल्या जावू शकते, यासाठी शासनाशी संवाद साधून प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या भागात सुरु असलेल्या उद्योगांचा अभ्यास करुन विद्यार्थ्यांच्या प्लेसमेन्टसाठी उद्योगानुरुप अभ्यासक्रम सुरु करणार असल्याचे ते म्हणाले. नवीन शैक्षणिक धोरण विद्यापीठामध्ये परिपूर्ण लागू करण्यासाठी तातडीने पाऊले उचलली जाणार आहे. या विद्यापीठातील प्रशासकीय व्यवस्था उत्तम असून शिक्षक व कर्मचारी तत्मयतेने व जबाबदारीने कामे करतात, ही जमेची बाजू आहे. विद्यापीठाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करणार असून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचायांची रिक्त पदे भरण्याकरीता शासनाकडे पाठपुरावा करणार आहे. शिक्षणातून सामाजिक विकास झाला पाहिजे, यादृष्टीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे फायदे समाजापर्यंत पोहोचविणार असल्याचेही ते म्हणाले. माझ्या कुलगुरू पदाच्या कार्यकाळात सर्वांचे मला निश्चितच सहकार्य लाभेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

स्वागतपर भाषण करतांना मावळते प्रभारी कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी यांनी सर्वप्रथम डॉ. मिलींद बारहाते यांची कुलगुरू म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. अष्टपैलू व तरुण व्यक्तिमत्व लाभलेल्या डॉ. बारहाते यांच्या नेतृत्वाखाली हे विद्यापीठ गतीशील प्रगती करेल, असा विश्वास त्यांनी दर्शविला. सद्यस्थितीत अनेक आव्हाने आहेत. हिततुल्य घटकांकडून वाढलेल्या अपेक्षा पूर्ण करण्याचे, खाजगी विद्यापीठांशी स्पर्धा, विद्यापीठातून दर महिन्याला कमी होत असलेले मनुष्यबळ, माईंड सेटमध्ये असलेली कमतरता, यांसह इतर आव्हाने असल्याचे ते म्हणालेत. कार्यक्रमाची सुरुवात वंदे मातरम, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने करण्यात आली. कार्यक्रमप्रसंगी कुलसचिव यांनी विद्यापीठाचे मावळते प्रभारी कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी यांचा, तर नवनियुक्त कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचा प्रा. माहेश्वरी यांनी पुष्पगुच्छ देवून विद्यापीठाच्यावतीने सत्कार केला. नियुक्त कुलगुरूंचा परिचय व प्रास्ताविकतेतून कार्यक्रमामागील भूमिका कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी मांडली. सुरुवातीला कुलगुरू कार्यालयात विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्यांशी कुलगुरूंनी वार्तालाभ केला. संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले. कार्यक्रमाला विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू, व्यवस्थापन परिषद, अधिसभा व विद्वत परिषदेचे सदस्य, विविध प्राधिकारणींचे सदस्य, अधिष्ठाता, संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी तसेच डॉ. बारहाते यांचे कुटुंबीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच सी.पी. ॲन्ड बेरार महाविद्यालय व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## बाजार समितीत शेतकरी व व्यापारी, अडत्यामध्ये राडा

### सभापतींची मध्यस्तीन वाद मिटला

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक अंजनगाव सुर्जी –** कृषी उत्पन्न बाजार समितीत २४ जानेवारी रोजी शेतकरी व व्यापारी, अडत्यामध्ये वाद झाला. तुरीला कमी भाव मिळत असल्याच्या कारणावरून शाब्दीक बाचाबाची झाली. यावेळी हाणामारी होते की काय असे वाटत होते; परंतु काही व्यापारी, अडते, शेतकरी व सभापतींनी मध्यस्थी केल्याने हा वाद मिटला.

सध्यस्थितीत तुरीला ठिकठाक भाव असल्याने बाजारसमितीमध्ये तुरीला आवक बऱ्यापैकी आहे. अशातच बाजार समितीमध्ये २३ जानेवारीलादुपारी ४ वाजता तुरीचा हर्रास सुरू होता. यावेळी कापूसतळणी येथील शेतकरी अमोल सगणे यांनी दुसऱ्या अडतमध्ये तुरीला ८ हजार रूपये भाव कसा मिळत आहे. ही संचालक व व्यापाऱ्यांची मिलीभगत आहे, असे म्हणून आरडाओरडा करत तंटा निर्माण केला. प्रारंभी बाजारसमितीमधील कर्मचारी, व्यापारी, अडते, खविसंचे संचालक अमोल पोटे यांनी शेतकऱ्यांची समजूत घातली; परंतु बोलाचालीचे रुपांतर एकमेकांचे कॉलर पकडेपर्यंत झाले. त्यामुळे लगेचच फोन करून पोलिसांना बोलावण्यात आले व दोन्हीही पक्ष एकमेकांविरोधातपोलिसस्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यास पोहचले; परंतु ठाणेदार प्रकाश अहिरे यांनी मध्यस्थी करून दोन्ही पक्षात समेट घडवून प्रकरण थंड केले.

सदर प्रकाराची चर्चा चांगलीच रंगत असताना तक्रारकर्ते सगणे यांचे तुरीचा माल बाजारसमितीत आलाच नसल्याने तथा बाजारसमितीमध्ये तुरीचे हर्रासीत त्यावेळेस नऊ हजाराखाली एकही सौदा झाला नसल्याचे आडते व बाजारसमिती कर्मचाऱ्यांकडून कळते. शेतकरी सगणे यांनी विनाकारण हल्लाकल्लोळ करत राडा केला, असा बाजारसमितीत सूर निघत होता.







## महानगरपालिका तर्फे राष्ट्रीय मतदार दिनानिमित्य मोटार सायकल रॅली

### लोकशाही बळकट करण्यासाठी नवमतदार नोंदणी महत्वाची– आयुक्त देविदास पवार

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** भारतीय राज्यघटनेने दिलेला मतदानाचा अधिकार हा अमूल्य अधिकार आहे, असे सांगून सशक्त लोकशाहीसाठी वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येकाने मतदार नोंदणी करून सजगतेने निवडणूक प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवून आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावावे, असे आवाहन महानगरपालिका आयुक्तदेविदास पवार यांनी केले. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त अमरावती महानगरपालिका राजकमल चौक येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मतदान न करणे म्हणजे लोकशाहीच्या मंदिरात निष्क्रिय राहिल्यासारखे ठरेल असे सांगून आयुष्यात एकदा तरी राज्यघटना वाचावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कोणीही १८ वर्षावरील पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी निवडणूक आयोग, प्रशासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे नमूद करून आपल्याबरोबर आपले कुटुंबिय, शेजारी, मित्र यांची विचारधारानकारात्मक असेल, तर ती मी मानसिकता बदलण्यासाठी प्रयत्न करा. त्यांना मतदान करण्यास प्रवृत्त न करा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.दरम्यान राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राजकमल चौक येथून काढण्यात आलेली मतदार जनजागृती सायकल रॅली उत्साहात संपन्न झाली. महानगरपालिका आयुक्त देविदास पवार यांनी उपस्थितांना राष्ट्रीय मतदार दिवसाची शपथ दिली व मतदार जनजागृती मोटर सायकल रॅलीस हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ केला. ही मोटरफ्सायकल रॅली राजकमल चौक ते जयस्तंभ चौक, इर्विन चौक, पंचवटी चौक ते छत्रपती शिवाजी सभागृह मोर्शी रोड येथे रॅलीची सांगता झाली.मतदार जनजागृती सायकल रॅलीमध्ये उपायुक्त जुम्मा प्यारेवाले, शहर अभियंता इकबाल खान, सहायक आयुक्त योगेश पिठे, भूषण पुसतकर, धनंजय शिंदे, महिला व बाल विकास अधिकारी नरेंद्र वानखडे, पशुशल्य चिकीत्सक डॉ. सचिन बोंन्द्रे, एन.यु.एल .एम. विशेष कार्यकारी अधिकारी पी. यु. वानखडे, उद्यान अधीक्षक श्रीकांत गिरी, सहायक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, वैद्यकीय अधिकारी डॉ. फिरोज खान, वैद्यकीय अधिकारी डॉ. संदिप पाटबागे, उपअभियंता प्रमोद इंगोले, नितीन बोबडे, अधिकारी, कर्मचारी, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक, स्वास्थ्य निरीक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शंकर बाबा पापळकरांच्या निमित्ताने सामाजिक संवेदना असलेल्या प्रत्येक अमरावतीकराला पद्म : आ.ॲड.यशोमती ठाकूर

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**





वझ्झर येथील आश्रमात सव्वाशे अंध, अपंग, पूर्णंतः मतिमंद मुलांना जवळपास ३० वर्षांपासून आपल्या मायेच्या पंखाखाली घेणाऱ्या शंकरबाबा पापळकर यांना पद्मश्री सन्मान जाहीर झाला आहे. पापळकर बाबांच्या कार्याचा अखेर उचित गौरव झाला असून हा केवळ बाबांचा सन्मान नाही तर सर्व संवेदनशिल अमरावती करांचा हा पद्म सन्मान आहे ,अशा शब्दात काँग्रेसच्या नेत्या आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी पापळकर यांना पद्मभुषण पुरस्कार जाहीर झाल्यानंतर आपल्या भावना व्यक्त केल्या. तसेच सर्वांना ७५ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

अमरावती जिल्ह्यातील वझ्झर येथे स्थापन केलेल्या आश्रमात बाबांनी आपल्या सामाजिक कार्याने अनेकांच्या जीवनात नंदनवन फुलवले आहे. कुणी सार्वजनिक संडासच्या टाकीत, कुणी मुंबईच्या फलाटावर, कुणी अकोल्याच्या स्टेशनलगतच्या नाल्यात किंवा कचरापेटीत फेकून दिलेली अशी मुले त्यांच्या आश्रमात आहेत. या अनाथ मुलांच्या संगोपनाचे आणि पुनर्वसनाचे काम बाबा करत आहेत.

सन १९९२ मध्ये अमरावती जिल्ह्यातील परतवाडा-चिखलदरा रोडवर वझ्झर फाटा येथे शंकरबाबांनी आश्रमाची स्थापना केली. बाबांनी आश्रमातील मुलांना आपले नाव दिले. एवढेच नव्हे तर एकूण बारा मुलांना नोकरी मिळवून देण्यात त्यांनी महत्वाचा वाटा उचलला आहे. एकेकाळी रस्त्याच्या कडेला टेबल टाकून त्यावर कपड्यांना इस्त्री करण्याचे काम ते करायचे. पुढे 'देवकीनंदन गोपाला' या नावाचे साप्ताहिकच काढले आणि त्याचे संपादक झाले. पापळकर बाबा यांच्यावर गाडगेबाबांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या या नियतकालिकावर होता. या नियतकालिकाच्या कामासाठी एकदा मुंबईला गेले असताना त्यांना फलाटावर मतीमंदांमधील शक्तीची ओळख झाली आणि या अवलियाचा प्रवास सुरु झाला. पुढे १९९१ च्या दरम्यान नाशिकच्या कुंभमेळ्यामध्ये मुलगी सापडली. त्यांनी तिला आश्रमात आणले. आश्रमातील बालकांना त्यांनी मोठे केले, शिकवले आणि आयुष्याचा जोडीदार शोधून जन्मदात्याचे कर्तव्य पूर्ण केले.

बाबा केवळ या मुलांच्या संगोपनासाठीच झटत असतात असे नाही तर त्यांचे पुनर्वसन करणे आवश्यक असल्याचेही सांगतात. त्यासाठीच १८ वर्षांवरील अनाथ मतिमंद मुलांच्या पुनर्वसनासाठी भारत सरकारने कायदा करावा अशी पापळकर बाबांनी मागणी केली आहे. यासाठी ते गेली अनेक वर्षे संघर्ष करत आहेत. बाबांनी आजपर्यंत जवळपास तीस जणांचे लग्न लावून देत दिव्यांगांच्या पुनर्वसनाचे सर्वोत्तम उदाहरण जगासमोर मांडले आहे. शंकर बाबांच्या कार्यासाठी पद्मभूषण पुरस्कारही तोकडाच आहे. मात्र, सरकारने त्यांचा यथोचित गौरव केला आहे, अशा शब्दात आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी ॲड ठाकूर यांनी ७५ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्त सर्वांना समृद्ध लोकशाहीच्या शुभेच्छा दिल्या.

# लग्न जुळवताना हुंडा मागता का? मराठा सर्वेक्षणासंबंधी प्रश्नावलीत वादग्रस्त प्रश्न

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

मराठा आरक्षणासाठीच्या आंदोलनाची तीव्रता वाढताच हादरलेल्या राज्य शासनाने २३ जानेवारीपासून मराठा समाजाचे आर्थिक आणि सामाजिक मागासलेपण तपासण्यासाठी सर्वेक्षण सुरू केले. परंतु, या सर्वेक्षणासाठी जी प्रश्नावली तयार करण्यात आली ती वादग्रस्त ठरत असून त्यातील काही अतार्किक प्रश्नांवर मराठा समाजाकडून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. "लग्न जुळवताना हुंडा मागता का?, तुमच्याकडे लग्नाचे वय कोणते - १२ ते १५ की १६ ते १८?" असे प्रश्न विचारून शासनाला खरेच आमचे मागासलेपण तपासायचे आहे की आम्हाला गुन्हेगार ठरवायचेय, हा अदृश्य कट आहे, असा सवालही काहींनी उपस्थित केला आहे.



> प्रश्नावलीतील काही प्रश्न अतिशय अतार्किक आहेत. हो, मी हुंडा घेतो, असे कोण म्हणेल? मुळात या सर्वेक्षणातून सरकारची विवशताच उघड झाली आहे. मराठे आता जुमानणार नाहीत, याचा अंदाज आल्याने सरकारने अतिशय घाईगडबडीत सर्वेक्षणाचा निर्णय घेतला आहे. तो केवळ उपचारापुरता असेल तर अशा बिनडोक प्रश्नावलीतून काहीच हाती लागणार नाही.
>
> **- सतीश साळुंखे, नागपूर जिल्हा अध्यक्ष, अ. भा. मराठा महासंघ**

२३ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२४ या आठ दिवसांत महाराष्ट्रातील सुमारे अडीच कोटी कुटुंबांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. परंतु, ज्या प्रश्नावलीच्या आधारे मराठा समाजाचे मागासलेपण तपासले जाणार आहे तिच्यावरच प्रश्नचिन्हे उपस्थित होत आहेत. त्याला कारणही तसेच आहे. ही प्रश्नावली विचारते, "तुमच्या समाजात विवाहित स्त्रियांनी डोक्यावर पदर घेतला पाहिजे असे बंधन आहे का?, विधवांना हळदी-कुंकवाला आमंत्रित करतात का?, विधवांना कपाळाला कुंकू लावण्याची, मंगळसूत्र घालण्याची मुभा आहे का?, विधुर पुरुषांचे पुनर्विवाह होतात का?, नवसासाठी कोंबडा/बकऱ्याचा बळी देण्याची पद्धत आहे का?", या प्रश्नांवर काहींचा आक्षेप असून या प्रश्नांना वर्तमान सरकारच्या हिंदुत्ववादी विचारधारेशीही जोडून पाहिले जात आहे.

# धर्मांध शक्तींना सत्तेतून बाहेर फेकण्याचा संकल्प करा प्रजासत्ताक दिनी काँग्रेसचे आवाहन

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**



देशाची सत्ता ज्या दिवशी धर्मांध शक्तींच्या हातात जाईल त्या दिवशी लोकशाही संपुष्टात येईल, असे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते ते आज स्पष्ट दिसत आहे. देशाला स्वातंत्र मिळवून देण्यासाठी मोठी लढाई लढावी लागली, बलिदान द्यावे लागले. सत्तेत आज धर्मांध शक्ती आहेत आणि लोकशाही, संविधान, सर्व लोकशाही व्यवस्था पायदळी तुडवली जात आहे. स्वातंत्र, लोकशाही, संविधानाला न मानणाऱ्या विचारधारेच्या धर्मांध शक्तींना सत्तेतून बाहेर फेकण्याचा संकल्प आजच्या प्रजासत्ताक दिनी करा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे.

काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे ७५ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दूरदृष्टीचे नेते होते, त्यांनी जी भिती व्यक्त केली होती ती आज खरी ठरत आहे. देशात जाती-धर्माच्या नावाने भांडणे लावली जात आहेत. विविध भाषा, जाती, धर्म, संस्कृतीचे लोक या देशात गुण्यागोविंदाने राहात असताना देश तोडण्याचे काम केले जात आहे. ओबीसी, आदिवासी, एससी, एसटी यांचे अधिकार कमी केले जात आहेत. गांधी-नेहरुंचा विचार संपवण्याचा प्रयत्न सुरु आहे. लोकशाहीचे चारही स्तंभ धोक्यात आहेत, अशी टीका नाना पटोले यांनी केली.

# शाळांना मिळणार तब्बल ८६ कोटींचे बंफर बक्षीस

## मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानाची चित्ररथाद्वारे जनजागृती प्रथम क्रमांकाच्या शाळेला ८६ लाखाचे बक्षीस, अभियानसाठी ८७ कोटींचे बजेट

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**




राज्यात विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी व प्रेरणादायी शाळा निर्माण व्हाव्या म्हणून मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान राबविले जात आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श योजनेअंतर्गत हे अभियान दिनांक १ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान राबविले जात आहे. अमरावती जिल्ह्यात या अभियानाची जनजागृती करण्यासाठी समग्र शिक्षा शिक्षण विभागच्या वतीने जिल्हाभरात चित्ररथ फिरणार असल्याचे शिक्षणाधिकारी प्रफुल्ल कचवे यांनी सांगितले.

शाळांमध्ये स्पर्धा निर्माण करून शैक्षणिक गुणवत्ता, अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, चांगले आरोग्य, कौशल्य विकास, राष्ट्रीय एकात्मता,व्यवसाय शिक्षण तसेच कला-क्रीडा गुणांचा विकास होण्यासाठी हे अभियान राबविले जात आहे.

अमरावती जिल्ह्याच्या वतीने प्रजासत्ताक दिनाच्या औचीत्यावर शिक्षण उपसंचालक शिवलिंग पटवे, शिक्षणाधिकारी प्रफुल्ल कचवे यांच्या हस्ते या चित्ररथाला हिरवी झेंडी देण्यात आली. या रथावर मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान,महावाचन उत्सव, दिव्यांग शिक्षण,पी.एम.श्री शाळा योजना बाबत माहिती दिली आहे. सोमवार ते शुक्रवार जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये हा चित्ररथ फिरून शाळाशाळांत जनजागृती करणार आहे.

**सुंदर शाळा अभियानाची व्याप्ती**

राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या सर्व शाळा या अभियानात सहभागी होऊ शकतात. हे अभियान दोन स्तरात विभागले असून पहिला स्तरात शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, दुसऱ्या स्तरात उर्वरित ईतर सर्व व्यवस्थापन शाळांचा समावेश आहे. तसेच सदर अभियान हे मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्र , वर्ग अ व वर्ग ब दर्जाच्या महानगरपालिका क्षेत्र, तर उर्वरित महाराष्ट्र अश्या तीन स्तरात विभागणी केली आहे.

**असे राहणार गुणदान**

हे अभियान एकूण १०० गुणात विभागले असून यात विद्यार्थी केंद्रित उपक्रम साठी ६० गुण तर शाळा व्यवस्थापन उपक्रम व सहभाग करीता ४० गुण राहणार आहे. विद्यार्थी केंद्रित उपक्रमात शाळा व परिसर सौंदर्यीकरण साठी १० गुण, विविध उपक्रमातील सहभाग, व्यवस्थापन व निर्णय प्रक्रिया सहभाग साठी १५ गुण, अवांतर उपक्रम १० गुण, इमारत व परिसर स्वच्छतासाठी १० गुण तर राष्ट्रीय उपक्रमांना चालना देणारे उपक्रम साठी ५ गुण तर विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन साठी १० गुण राहणार आहे. तसेच आरोग्य साठी १५ गुण, आर्थिक साक्षरता व कौशल्य विकास साठी १० गुण, बाह्य संस्था व व्यक्ती सहकार्य साठी ५ गुण, तंबाखू मुक्त शाळा करीता ५ गुण तर ईतर विद्यार्थी केंद्रित उपक्रमासाठी ५ गुण असे एकूण ४० गुण शाळा व्यवस्थापन समिती सहभाग करीता दिलेले आहे.

**असे राहणार बक्षिसे**

यामध्ये तालुकास्तरीय प्रथम बक्षीस ३ लक्ष रुपये, द्वितीय २ लक्ष तर तृतीय बक्षीस १ लक्ष रुपये राहणार आहे. जिल्हास्तरासाठी प्रथम प्रथम बक्षीस ११ लक्ष रुपये, द्वितीय ५ लक्ष तर तृतीय बक्षीस ३ लक्ष रुपये राहणार आहे. विभागस्तरासाठी प्रथम बक्षीस २१ लक्ष रुपये, द्वितीय ११ लक्ष तर तृतीय बक्षीस ७ लक्ष रुपये राहणार आहे. तर राज्य स्तरासाठी प्रथम बक्षीस ५१ लक्ष रुपये, द्वितीय २१ लक्ष तर तृतीय बक्षीस ११ लक्ष रुपये राहणार आहे. या अभियान अंतर्गत बक्षीसासाठी एकूण ६६१० लक्ष रुपयाची तरतूद केली असून प्रचार, प्रसार, प्रवासखर्च, ईतर कार्यक्रम साठी २०६३ लक्ष रुपये असे एकूण ८६७३ लक्ष रुपयांची तरतूद शासनातर्फे केली आहे.तर एका शाळेला मिळणार ८६ लाख.

या स्पर्धेत एखादी शाळा तालुकास्तरावर प्रथम क्रमांकसाठी पात्र ठरल्यास ३ लक्ष, तीच शाळा जिल्हास्तरावर प्रथम आल्यास ११ लक्ष ,विभाग स्तरासाठी २१ आणि तीच शाळा राज्यस्तरावर यशस्वी ठरल्यास राज्याचे प्रथम बक्षीस ५१ लक्ष असे सर्व मिळून एकूण ८६ लक्ष रुपये बक्षिसाची मानकरी ठरू शकतात. प्रथमच शाळांसाठी एवढ्या मोठ्या बक्षिसाची हि स्पर्धा असून अमरावती विभागातील प्रत्येक शाळेने यात सहभागी होण्याचे आवाहन शिक्षण उपसंचालक डॉ.शिवलिंग पटवे यांनी सांगितले.

# अंध शंकर उर्फ मोहन शिवराम सरदार यांच्या नावावर घरकुलाचे पैसे केले गायब

## चक्रनारायण बसले कुटुंबासह लाक्षणिक उपोषणाला

**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर**

तालुक्यातील सर्वात शेवटचे गाव म्हणजे सुकळी या सुकळी गावात घरकुलामध्ये भ्रष्टाचार केल्याची तसेच रोजगार सेवकाने झाडे लावण्या मध्ये सुद्धा भ्रष्टाचार केला ग्राम तात्कालीन ग्रामसेवक सौ बुध मॅडम यांच्या नावाने तक्रार निलेश मधुकर चक्रनारायण यांनी केली होती त्या तक्रारीची चौकशी करण्याकरिता दर्यापूर पंचायत समितीचे अधिकारी सुकळी येथे ग्रामपंचायत कार्यालयामध्ये आले व चौकशी करायला लागले मात्र चौकशी होत आहे म्हणून रोजगार सेवक विलास चक्रनारायण व सुकडीच्या सरपंच सौ बबीता विलास चक्रनारायण यांनी संबंधित अधिकाऱ्यांसमोर निलेश मधुकर चक्रनारायण यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण केली त्यामुळे चौकशी संबंधित अधिकाऱ्यांना करता आली नाही चौकशी दिली नाही उलट संबंधित तक्रार करताना लाथा बुक्क्यांनी मारल्यामुळे आज २६ जानेवारी २०२४ ला सकाळी संबंधित तक्रार करते त्यांना मारहाण झाल्याच्या निषेधार्थ दर्यापूर पंचायत समिती समोर आमरण उपोषणाला बसले असून न्याय दर मिळाला नाही तर उपोषण मागे घेणार नाही असे मत वैभव मधुकर राऊत यांनी सांगितले दर्यापूर पंचायत समिती समोर उपोषणाकरिता चक्रनारायण यांची पत्नी वैशाली निलेश चक्रनारायण त्याचबरोबर मुलगा वंश चक्रनारायण, घरकुलाचे लाभार्थी अंध मोहन उर्फ शंकर सरदार वय ५५ वर्ष हे सुद्धा उपोषणाला बसले आहेत त्याचबरोबर या उपोषणाला गावातल्या अनेक लोकांचा पाठिंबा असल्याचेही वैभव राऊत यांनी सांगितले.



# निवेदीता चौधरी अमरावती लोकसभा प्रभारी

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आगामी लोकसभेच्या निवडणुका सुरू होण्यापूर्वी भाजपाने अमरावती लोकसभा प्रभारी म्हणुन भाजपाच्या जेष्ठ नेत्या निवेदिता चौधरी यांची नियुक्ती केली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भाजपा व मित्र पक्षांचे जास्तीत जास्त खासदार लोकसभेत निवडून आणण्यासाठी कार्यकर्ते उत्साहाने कामाला लागले आहे. निवेदिता चौधरी यांनी भाजपाची स्थापना झाल्यापासून पक्षाच्या विविध पदांवर काम केले आहे त्यांचे पक्षासाठीचे योगदान पहाता आज भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी निवेदिता चौधरी यांची अमरावती सारख्या महत्वाच्या लोकसभा मतदारसंघाच्या प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे.या नियुक्तीबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.नियुक्ती झाल्याबरोबर निवेदिता चौधरी यांनी लोकसभा मतदारसंघात नियोजनात्मक बैठकी सुरू केल्या आहे.अमरावती भाजपा शहर अध्यक्ष व अमरावती भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष यांच्याशी समन्वय ठेवून व भाजपाच्या तळागळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन अमरावती लोकसभेत भाजपा महायुतीच्या उमेदवारांचा विजय संयुक्तरित्या सुकर करण्यासाठी आपण परिश्रम करू अशी प्रतिक्रिया त्यांनी वेळी दिली.

# 'एमपीएससी'च्या परीक्षेसाठी अर्ज करता, शुल्क भरताना अडचण आल्यास या सूचनांचे पालन करा

**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत पुढील संवर्गातील एकूण १७४ पदांच्या भरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत 'महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४' रविवार २८ एप्रिल २०२४ रोजी ३७ जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल. संयुक्त पूर्व परीक्षेतून मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरिता स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येतील. सामान्य प्रशासन विभाग -राज्य सेवा गट-अ व गट-ब-एकूण २०५ पदे आहेत. मुख्य परीक्षा १४ ते १६ डिसेंबर २०२४ दरम्यान होणार आहे. परीक्षेसाठी अर्ज करणे सुरू झाले आहे.

हा अर्ज करताना विद्यार्थ्यांच्या खात्यातून परीक्षा शुल्काची रक्कम वजा होऊनही 'इनव्हॅलीड कोर्स रिक्वेस्ट' किंवा 'फीस नॉट पेड' असा शेरा येत असल्यास 'चेक पेमेंट स्टेटस' या टॅबवर क्लिक केल्यास परीक्षा शुल्काची अद्यावत स्थिती कळणार आहे. त्यामुळे अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही महत्त्वाची सूचना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या ट्विटरवर देण्यात आली आहे.




महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत 'महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४'साठी विविध पदांसाठी अर्ज काढण्यात आले आहेत. यामध्ये जाहिरातीत पदांची पात्रताही देण्यात आली आहे. त्यानुसार वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, वनशास्त्र, भूशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र, सांख्यिकी, प्राणीशास्त्र, उद्यानविद्याशास्त्र, कृषिशास्त्र, कृषी, रसायन, स्थापत्य/ ऑटोमोबाईल/संगणक/ पॉवर/ प्रोडक्शन/ विद्युत/ इलेक्ट्रॉनिक्स/ यंत्र/ इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्युनिकेशन/संगणक विज्ञान व तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, संगणक प्लिकेशन, संगणक विज्ञान, पर्यावरण विज्ञान, पशुवैद्याकीय विज्ञान यापैकी कोणत्याही एका विषयातील पदवी असणे आवश्यक आहे.

राज्य सेवा मुख्य परीक्षा - ८०० गुणांसाठी मुलाखतीचे गुण - १००

इतर संवर्गासाठी स्वतंत्र मुख्य परीक्षा ४०० गुणांसाठी, मुलाखतीचे गुण - ५०.

परीक्षा शुल्क - अमागास - रु. ५४४/-; मागासवर्गीय/आदुघ/ अनाथ/दिव्यांग - रु. ३४४/- ऑनलाइन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक २५ जानेवारी २०२४ (२३.५९ वाजेपर्यंत). भारतीय स्टेट बँकेत चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक २८ जानेवारी २०२४ (२३.५९ वाजे) पर्यंत. चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक २९ जानेवारी २०२४ (बँकेच्या कार्यालयीन वेळेत).

# लोकशाही अधिकाधिक बळकट करण्याचा संकल्प आपण सर्वांनी करू या - विभागीय आयुक्त श्रीमती पांडेय

## प्रजासत्ताक दिनानिमित्त विभागीय आयुक्तांच्या हस्ते ध्वजारोहण







**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भारतीय प्रजासत्ताकाच्या ७४ व्या वर्धापन दिनोत्सवानिमित्त विभागीय आयुक्त डॉ. निधि पांडेय यांनी पं. जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये आयोजित मुख्य सोहळ्यात ध्वजारोहण करुन तिरंग्यास मानवंदना दिली. यावेळी विभागीय आयुक्त यांनी उपस्थित सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

जगातील सर्वात मोठी व यशस्वी लोकशाही म्हणून भारताचा जगभर गौरव होतो. ही संविधानाची ताकद आहे आणि येथील नागरिकांच्या सौहार्द, सहिष्णूता व बंधुभावाचे ते गमक आहे. नागरिक म्हणून आपले कर्तव्य पाळून ही लोकशाही अधिकाधिक बळकट करण्याचा संकल्प आपण सर्वांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त करूया, असे आवाहन विभागीय आयुक्त श्रीमती पांडेय यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा, पोलीस अधीक्षक विशाल आनंद सिंगुरी, राज्य राखीव पोलीस दलाचे समादेशक राकेश कलासागर, मनपा आयुक्त देविदास पवार आदी यावेळी उपस्थित होते.

राष्ट्रध्वज वंदन, राष्ट्रगीत व राज्यगीत यावेळी सादर करण्यात आले. विभागीय आयुक्तांनी मैदानावर जीपमधून फेरी मारून पोलीस, विविध सुरक्षा दल व विभागाच्या पथकांचे निरीक्षण केले. त्यांच्या हस्ते विविध गुणवंत अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी गौरविण्यात आले.

मुख्य समारंभ स्थळी अतिथींच्या हस्ते पुरस्कारार्थींना पुरस्कृत करण्यात आले. यामध्ये पोलीस अंमलदार प्रवीण दादाराव आखरे यांनी पोलीस जलतरण केंद्र येथे पाण्यात उभे राहण्याच्या उपक्रमाची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये करण्यात आली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले. माजी जिल्हा समादेशक सरदारसिंग शर्मा, जिल्हा मार्गदर्शक हरीश ढाकुलकर, जिल्हा आरएसपी अधिकारी आनंद मधुकर महाजन, जिल्हा समादेशक सागरसिंह प्रतापसिंह कनकुरे यांना वाहतूक सुरक्षेबाबत युवकांमध्ये जनजागृती निर्माण करुन मार्गदर्शन करीत असल्याबाबत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. होमगार्ड जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे नायक अजय भाऊरावजी आसोले यांना आपत्ती व्यवस्थापनामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबाबत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. सैनिक कल्याण विभागामार्फत सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनामध्ये केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हाधिकारी सौरभ कटियार तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी आशिष बीजवल यांना सन्मानित करण्यात आले. अमरावती जिल्हांतर्गत नगर परिषद अंजगाव सुर्जी तथा इतर नगर परिषद, नगरपंचायत कार्यक्षेत्रात वेळोवेळी उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये उल्लेखनीय कामगिरीबद्दल अंजगाव सुर्जी नगरपरिषदेचे अग्नीशमन अधिकारी संदेश विश्वनाथ जोगदंड यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच दंत चिकित्सक डॉ. सैय्यद अबरार ग्रामीण व शहरी भागातील गरजू व गोरगरीब नागरिकांना माफक दरात दंत वैद्यकीय सेवा पुरवितात. त्यांच्या या समाजकार्याचा सन्मान म्हणून सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमातील परेडचे पथसंचलन पोलीस उपविभागीय अधिकारी परेड कमांडर डॉ. निलेश पांडे यांनी केले. पथ संचालनालयामध्ये नक्षलग्रस्त भागामध्ये कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या राज्य राखीव पोलीस बल गट, पोलीस आयुक्त अमरावती शहर पोलीस पथक, पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण पोलीस पथक, अमरावती शहर व ग्रामीण महिला तक्रार निवारण पथक, पोलीसांना बंदोबस्तात सहकार्य करणारे गृहरक्षक दल पुरुष, शहर वाहतूक पथक, गृहरक्षक महिला दल, एनसीसी युनिट पथक, महिला आर्थिक विकास महामंडळाचा महिला सक्षमीकरणावरील तसेच महिला बाल विकास विभागाचा चित्ररथ, जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक विभागाचा चित्ररथ, परिवहन महामंडळाचा चित्ररथ यासह स्कुल ऑफ स्कॉलर्स स्काऊट पथक, तखतमल इंग्लिश स्कुल, दीपा इंग्लिश प्रायमरी स्कुल, जिप गर्ल व बॉईज हायस्कुल, होलीक्रॉस मराठी प्रायमरी स्कुल, आरएससी अस्मिता विद्यालय (गर्ल्स), होलीक्रॉस गर्ल्स हायस्कुल, एसआरपीएफ बँड पथक, डायल ११२ वाहन, जलद प्रतिसाद पथक, मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन, अग्नीशमक वाहन, दंगा नियंत्रण वज्र वाहन, वरुण वाहन पथक यांनी पथमार्गावर संचलन केले.

कार्यक्रमामध्ये एकूण १५ प्लाटुन होते. यामध्ये २०३ कर्मचारी, १८९ विद्यार्थी सहभागी होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन देशमुख यांनी केले. यावेळी लोकप्रतिनिधी, जेष्ठ सेनानी, वीरमाता, पिता, पत्नी तसेच त्यांचा आप्त परिवार, विविध क्षेत्रांतील मान्यवर, महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक व विद्यार्थी अधिकारी तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय प्रजासत्ताकाचा ७४ वा वर्धापन दिन सोहळा उत्साहात; जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण



**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,**

भारतीय प्रजासत्ताकाच्या ७४ व्या वर्धापन दिनोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण उत्साहात संपन्न झाले.

यावेळी पोलीस वाद्यवृंद पथकाच्या तालावर राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताने राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. ध्वजारोहणानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संवाद साधून प्रजासत्ताक दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी सुरज वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी आशिष बीजवल, उपजिल्हाधिकारी रणजित भोसले, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, जिल्हा नियोजन अधिकारी अभिजीत म्हस्के, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, जिल्हा खनिकर्म अधिकारी इम्रान शेख, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा, तहसीलदार विजय लोखंडे तसेच अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

## जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था येथे प्रजासत्ताक दिन साजरा

### परीचराला मिळाला ध्वजारोहणचा सन्मान



**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावती येथे ७५ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावर्षी संस्थेचे परिचर गजानन पुरुषोत्तम पाठक यांचे हस्ते प्रजासत्ताक दिनाचे ध्वजारोहण करण्यात आले.

प्रत्येक शासकीय कार्यालयात कर्मचाऱ्यांना वर्ग श्रेणीनुसार कामकाज व मान सन्मान दिल्या जातो. आयुष्यातील २५ ते ३५ वर्ष सेवा करत असताना अनेकांना राष्ट्रीय दिनाच्या ध्वजारोहणाचा मान मिळत नाही. प्रादेशिक विद्या प्राधिकरण अमरावती तथा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावतीचे प्राचार्य मिलिंद कुबडे यांनी या बाबीला हेरले. श्रमप्रतिष्ठाचा सन्मान व्हावा या उद्देशाने प्राचार्य यांनी ध्वजारोहणाचा सन्मान संस्थेत ३० वर्ष सेवा देणारे चतुर्थ श्रेणी कर्मचारी गजानन पुरुषोत्तम पाठक यांना दिला. गत स्वातंत्र्यदिनाला सुध्दा याच संस्थेतील परिचर सुनंदा रामेश्वर हरणे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विशेष म्हणजे सुनंदा हरणे ह्या जून २०२४ मध्ये तर गजानन पाठक हे ऑक्टोंबर २०२४ मध्ये सेवा निवृत्त होत आहे.ध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य मिलिंद कुबडे यांचेसह ज्येष्ठ अधिव्याखता प्रेमला खरटमोल, अधिव्याख्याता विजय शिंदे, डॉ.राम सोनारे, डॉ. विकास गावंडे, दीपक चांदूरे, वर्षा मोरे, कविता बुरघाटे, अधीक्षक विलास ठाकरे, प्रमोद ठवकर, श्याम गाढे, निशिकांत दाळू, मुकुंद वरघट, अमोल गजभिये,कांचन दुधे, वैशाली शिरभाते , सतिश मनोहर, श्रीनाथ वानखडे, ममता गुर्जर, सबाह शेख, जयश्री धोटे, संगीता क्षीरसागर, अर्चना जुमडे, रवींद्र इंगळे, विजय उंबरकर, गोपाळ ढवळी,निरंजन नांदूरकर, दादाराव गवई, श्री चिमोटे आदींची प्रामूख्याने उपस्थिती होते.

**श्रम प्रतिष्ठेचा सन्मान - प्राचार्य मिलिंद कुबडे**

माझ्या संस्थेतील प्रत्येक कर्मचारी हे माझ्यासाठी एक समान आहे. शासकीय नियमानुसार वर्गश्रेणी असली असली प्रत्येकाच्या श्रमप्रतिष्ठेचा मानसन्मान करणे हे माझे संस्थाप्रमुख म्हणून कर्तव्य समजतो. यापूर्वी माझ्या संस्थेतील कंत्राटी कर्मचारी, व इतरांना सुध्दा हा सन्मान दिला आहे.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त जिजाऊ बँकेत ध्वजारोहण



**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भारतीय प्रजासत्ताकाच्या ७४ व्या वर्धापन दिनानिमित्त स्थानिक जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव बँकेत अध्यक्ष इंजी.अविनाश कोठाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. यावेळी उपाध्यक्ष प्रदीप चौधरी, रामचंद्र ठाकरे, श्री डहाके, अनिल टाले, बबनराव आवारे, श्री पेठे,अरविंद गावंडे, प्रशांत गावंडे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन वानखडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी हरीश नाशिरकर, प्रशासन अधिकारी अर्चना बारबुद्धे, शाखाप्रबंधक राजेश बंड, विलास सबाने, प्रकाश बंड, अविनाश चिखले, मनोज काळमेघ, अमोल चित्रे, विजय ढोबे यांच्यासह जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या साईनगर, गाडगेनगरसह विविध शाखेतील अधिकारी व कर्मचारी सुद्धा यावेळी उपस्थित होते. राष्ट्रध्वज वंदन, राष्ट्रगीत व तिरंग्यास मानवंदना याप्रमाणे विविध कार्यक्रम दरम्यान संपन्न झाला. बँकेचे संस्थापक अध्यक्ष अविनाश कोठाळे व उपाध्यक्ष प्रदीप चौधरी यांनी बँकेतील संपूर्ण अधिकारी व कर्मचाऱ्यांना गणतंत्र दिनानिमित्त शुभेच्छा देखील दिल्या.

## अमरावती जिल्ह्यातील शंकरबाबा पापळकर यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर

**दि२६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील वझर येथील १२३ अनाथ मुलांचा सांभाळ करणारे शंकरबाबा पापळकर यांना केंद्र सरकारच्या वतीने देण्यात येणारा पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे.शंकरबाबा पापळकर हे ९० च्या दशकापासून अनाथ अपंग मतिमंद व दिव्यांग मुलांसाठी अविरतपणे काम करत आहेत. त्यांनी आतापर्यंत रेल्वे स्टेशन,बस स्टँड व अनाथालयात सोडून दिलेल्या १२३ बेवारस मुलांना स्वतःचे नाव देऊन त्यांचे संगोपन केले आहे.शंकरबाबांनी आतापर्यंत अनेक दिव्यांग मुला मुलींचे लग्न लावून त्यांचे संसार थाटात उभे करून दिले.वझ्झर येथील त्यांचे अंबादासपंत वैद्य अपंग मुलामुलींचे आश्रम आहे. शंकर बाबा पापळकर यांना हा पुरस्कार मिळाल्याने विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदन वर्षाव केला जात आहे. हा पुरस्कार दिव्यांग मुलांसाठी आजीवन पुनर्वसनाचा कायदा करेल याची मला खात्री आहे या करिता हा पद्मश्री पुरस्कार मी स्विकारणार असं पापळकर यांनी सांगितले.

## दिनदर्शिका विमोचन.......



शेगाव राहटगाव प्रभागातील अनुसूचित जाती शहर अध्यक्ष डॉ धनराज चक्रे मित्र मंडळाच्या वतीने आज दिनदर्शिका विमोचन माननीय विद्यमान आमदार तथा माझी पालकमंत्री व भाजपा शहर अध्यक्ष मा.प्रवीणजी पोटे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

## महानगरपालिकेत आयुक्त देविदास पवार यांच्या हस्ते ध्वजारोहन



**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती महानगरपालिकेत प्रजासत्ताक दिनाचा ७४ वा वर्धापन दिन महानगरपालिका आयुक्त देविदास पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन साजरा करण्यात आला. शुक्रवार दिनांक २६ जानेवारी,२०२४ रोजी अमरावती महानगरपालिकेच्या प्रांगणात सदर ध्वजारोहणाचा कार्यक्रम सकाळी ठिक ८.१५ वाजता घेण्यात आला. यावेळी मा.आयुक्त यांच्या पत्नी सौ.मनिषा देविदास पवार मॅडम, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, उपायुक्त जुम्मा प्यारेवाले, शहर अभियंता इकबाल खान, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, मुख्यलेखाधिकारी हेमंत ठाकरे, पर्यावरण संवर्धन अधिकारी महेश देशमुख, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, विवेक देशमुख, लिना आकोलकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, कार्यकारी अभियंता रविंद्र पवार, एन.यु.एल.एम. विशेष कार्यकारी अधिकारी पी.यु.वानखडे, पशुशल्य चिकीत्सक डॉ.सचिन बोंन्द्रे, बाजार व परवाना अधिक्षक उदय चव्हाण, भांडार अधिक्षक मंगेश जाधव, कार्यशाळा उपअभियंता लक्ष्मण पावडे, उपअभियंता प्रमोद इंगोले, नितीन बोबडे, आशिष अवसरे, अजय विंचुरकर, हेमंत महाजन, राजेश आगरकर, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महानगरपालिका आयुक्त देविदास पवार यांनी भारताच्या ७४ व्या प्रजासत्ताक दिनाच्या मंगलमय प्रसंगी, अमरावतीच्या जनतेला व उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या.

२६ जानेवारी हा भारताच्या. सन्मानाचा व अभिमानाचा दिवस आहे. आपल्या भारताला स्वातंत्र्य सहजा सहजी मिळाले नाही. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.त्या सर्व शूर स्वातंत्र्यसैनिकांमुळे आज आपण आपल्या देशात मुक्त श्वास घेत आहोत.स्वातंत्र्यानंतर आपल्या देशाने कृषी, विज्ञान व तंत्रज्ञान, साहित्य, खेळ इ. सर्व क्षेत्रात चांगली प्रगती केली आहे. आज भारताकडे स्वतःचा आण्विक साठा आहे. भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

